सार्वजनिक उपक्रम समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित,

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ व

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्या कामकाजासंबंधात अनुक्रमे महाराष्ट्र शासनाच्या २००५-२००६ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या (वाणिज्यिक)अहवालातील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित बाबत परिच्छेद क्रमांक ४.१५ तसेच

सन २००६-२००७ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक)

अहवालातील अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित यांच्या संबंधात प्रकरण चार मधील परिच्छेद क्रमांक ४.१ व महामंडळाच्या कामकाजाच्या आढाव्यासंबंधीचा तसेच महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्या. यांच्या बाबत

परिच्छेद क्रमांक ४.२० तसेच सन २००७-२००८ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१७ यावरील समितीचा

तिसरा अहवाल

(दिनांक १४ डिसेंबर, २०१० रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर केला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/ नागपूर

सार्वजनिक उपक्रम समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित,

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ व

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्या कामकाजासंबंधात अनुक्रमे महाराष्ट्र शासनाच्या २००५-२००६ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादितबाबत परिच्छेद क्रमांक ४.१५ तसेच

सन २००६-२००७ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक)

अहवालातील अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित संबंधात प्रकरण चार मधील परिच्छेद क्रमांक ४.१ व महामंडळाच्या कामकाजाच्या आढाव्यासंबंधीचा तसेच महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्या. यांच्याबाबत

परिच्छेद क्रमांक ४.२० तसेच सन २००७-२००८ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१७ यावरील समितीचा

तिसरा अहवाल

सार्वजनिक उपक्रम समिती
(२०१०-२०११)

	समिती प्रमुख
१)	श्री. सदाशिवराव पाटील, वि.स.स.
	सदस्य
२)	श्री.मधुकर ऊर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
३)	कु.प्रणिती शिंदे, वि.स.स.
४)	श्री. डी.पी.सावंत, वि.स.स.
५)	डॉ.कल्याण काळे, वि.स.स.
६)	श्री.सुभाष घोटे, वि.स.स.
७)	श्री.विवेकानंद पाटील, वि.स.स.
८)	श्री. विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.
९)	श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.
१०)	श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.
११)	श्री. बदामराव पंडित, वि.स.स.
१२)	श्री. सुरेश देशमुख, वि.स.स.
१३)	श्री. जयकुमारभाऊ रावल, वि.स.स.
१४)	श्री. अतुल देशकर, वि.स.स.
१५)	श्री. विजयकुमार देशमुख, वि.स.स.
१६)	श्री. प्रमोद जठार, वि.स.स.
१७)	श्री. राजन विचारे, वि.स.स.
१८)	श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स.
१९)	श्री. महादेव बाबर, वि.स.स.
२०)	श्री. प्रविण दरेकर, वि.स.स.
२१)	श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
२२)	श्री. चरणसिंग सप्रा, वि.प.स.
२३)	श्री. हेमंत टकले, वि.प.स.
२४)	श्री. संजय केळकर, वि.प.स.
* २५)	श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री. अ.ना.कळसे, प्रधान सचिव,
श्री. श्रीधर राजोपाध्ये, उप सचिव,
श्री. सुधीर वळवी, अवर सचिव (समिती),
श्री. अ. ल. जोशी, कक्ष अधिकारी

*श्री. अनिल परब, वि.प.स. यांची सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्याच्या रिक्त जागी श्रीमती शोभाताई फडणविस वि.प.स. यांची दि. ६ ऑगस्ट, २०१० पासून नियुक्ती करण्यात आली.

**श्री.डी.पी.सावंत, वि.स.स. यांची दिनांक १८ नोव्हेंबर, २०१० रोजी राज्यमंत्री म्हणून मंत्रीमंडळामध्ये नियुक्ती झाल्यामुळे रिक्त जागा.

अनुक्रमणिका

अनुक्रमांक (१)	तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	
एक	**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित (ले.प.अ., २००५-२००६)** **१) डेक्कन ओडीसीचे कार्यचालन (परिच्छेद क्रमांक ४.१५)**	(१) -
दोन	**अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ (ले.प.अ., २००६-२००७)** **२)माहितीपत्रके / भिंतीपत्रके छपाईवरील वायफळ खर्च (परिच्छेद क्रमांक ४.१)** **३)महामंडळाच्या आढावा संबंधातील सर्वसाधारण मुल्यमापन**	**९**
तीन	**महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित (ले.प.अ., २००६-२००७)** **४) अग्निशामके खरेदीमधील जादा खर्च. (परिच्छेद क्रमांक ४.१)** **(ले.प.अ., २००७-२००८)** **५) क्रिडा मैदानी उपकरणे खरेदीमधील जादा खर्च (परिच्छेद क्रमांक ३.१७)**	**१८**
चार	बैठकीची परिशिष्ट	**४२**

प्रस्तावना

मी, सार्वजनिक उपक्रम समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन महाराष्ट्र शासनाच्या सन २००५-२००६ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण चार मधील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांच्या कामकाजासंबंधात परिच्छेद क्रमांक ४.१५ व अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित यांच्या कामकाजासंबंधात भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वाणिज्यिक अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.१ व महामंडळाच्या कामकाजाबाबत आढाव्या संबंधातील मुल्यमापन तसेच महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्या कामकाजासंबंधात भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या वाणिज्यिक अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.२० व सन २००७-२००८ च्या वाणिज्यिक अहवालांतील परिच्छेद क्रमांक ३.१७ यावरील समितीचा तिसरा अहवाल (बारावी महाराष्ट्र विधानसभा) सादर करीत आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून सादर करण्यात आलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक माहितीवर महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाचे प्रधान सचिव श्री. आनंद कुलकर्णी व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. अविनाश ढाकणे यांची समितीने बुधवार, दिनांक ५ मे, २०१० रोजी साक्ष नोंदवून घेतली.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडून सादर करण्यात आलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक माहितीवर व महामंडळाच्या कामकाजासंबंधातील आढाव्याबाबत देण्यात आलेल्या लेखी माहितीवर आधारीत महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सचिव श्री. महेश पाठक व अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, श्री.वि.रा.शिरसाट व माजी व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय कापडणीस यांची समितीने बुधवार, दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी साक्ष नोंदवून घेतली.

महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडून सादर करण्यात आलेल्या स्पष्टीकरणात्मक माहितीवर महाराष्ट्र शासनाच्या लघु व मध्यम उद्योग विभागाचे सचिव

श्री.संजय सेठी व महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादितचे व्यवस्थापकीय संचालक श्री. जे. पी.फिलिप यांची समितीने बुधवार दिनांक २७ ऑक्टोबर, २०१० रोजी साक्ष नोंदवून घेतली.

श्रीमती सायंतनी जाफा, महालेखाकार (वाणिज्यिक लेखा परिक्षक) वरिष्ठ लेखा अधिकारी, श्री.पी.पी.लोणकर यांनी निमंत्रणानुसार समितीच्या बैठकींना उपस्थित राहून त्यावेळेस समितीला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांचे आभार मानते. महाराष्ट्र पर्यटन विभागाचे प्रधान सचिव, श्री. आनंद कुलकर्णी तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. अविनाश ढाकणे व उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सचिव श्री.महेश पाठक व अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. वि.रा.शिरसाट व माजी व्यवस्थापकीय संचालक श्री.संजय कापडणीस तसेच लघु व मध्यम उद्योग विभागाचे सचिव श्री. संजय सेठी व महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री.जे.पी. फिलीप यांनी समितीला केलेल्या संपूर्ण सहकार्याबद्दल समिती त्यांचे आभार मानते.

समितीने मंगळवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०१० रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करुन तो काही सुधारणांसह संमत केला.

सदाशिवराव पाटील,
समिती प्रमुख,
सार्वजनिक उपक्रम समिती.

विधान भवन,
नागपूर,

महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ

एक : डेक्कन ओडीसीचे कार्यचालन :

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण ४ मधील परिच्छेद क्रमांक ४.१५ मध्ये "डेक्कन ओडीसीचे कार्यचालन" यासंबंधी महालेखाकारांनी पुढील प्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत :-

डेक्कन ओडीसीच्या कार्यान्वयात कंपनीला २००४-०५ या कालावधीत रु. ६६.९९ लाखाचे नुकसान झाले होते. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित (कंपनी) ने "डेक्कन ओडीसी" नावाची एक प्रवासी रेल्वे गाडी ऑक्टोबर, २००४ पासून कार्यरत केली आहे.

ओडीसीच्या २००४-०५ च्या कार्यान्वयाची लेखी परीक्षणाने छाननी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या. या कालावधीच्या कार्यान्वयात रु. ६६.९९ लाखाचे नुकसान झाले होते. आरक्षण अभिकर्त्यांना दिली गेलेली रु. ३८.८३ लाखाची दलाली हा या खर्चातील महत्वाचा घटक होता. सात दिवसांच्या पर्यटनासाठी तिकीटांच्या किंमतीच्या १७ टक्के म्हणजे रु. १८०००/- प्रति तिकीट एवढी रक्कम प्रत्येक तिकीटामागे आरक्षण अभिकर्त्यांना दलाली म्हणून दिली जाते. कंपनीने आपल्या उत्तरात (जुलै, २००६) म्हटले होते की, "फिरत्या राजवाडया" ने सुध्दा हीच प्रथा अवलंबली आहे व तिकीटाचे दर निश्चित करताना दलालीचा घटक सल्लागारांनी विचारात घेतला होता. हे उत्तर समर्थनीय नाही. कंपनीकडे स्वतःची वेबसाईट आहे व त्या अत्याधुनिक तंत्रशास्त्राद्वारे इंटरनेटवर आरक्षण करुन व्यवहाराची किंमत कमी करणे शक्य होते व ते तंत्र परदेशी व लक्षित प्रवाश्यामध्ये खुपच लोकप्रिय आहे यामध्ये झ ालेल्या बचतीद्वारे मागणी वाढविण्यासाठी तिकीटाची रक्कम कमी करुन ती "फिरत्या राजवाडया" पेक्षा कमी ठेवता आली असती. आरक्षण अभिकर्त्यांना दिलेली दलाली ही त्यांच्या कामामध्ये अंतर्भूत असलेल्या कामाएवढी नव्हती.

२००४-०५ या कालावधीत प्रथम कार्यान्वयात ५७ व्यक्तींना तिकीटांसाठी कोणतेही मूल्य न देता प्रवास करायला परवानगी देण्यांत आली होती. हया विनामुल्या टिकींटांची किंमत रु. ६२.८४ लाख एवढी काढण्यांत आली होती. व्यवस्थापनाने म्हटले होते (जुलै, २००६) की, या व्यक्तींनी डेक्कन ओडिसीवर त्यांच्या मासिकातून काही लेख लिहीले, त्यामुळे कंपनीचा

जाहिरातीवरील बराच खर्च वाचला होता. हे उत्तर समर्थनिय नाही. कारण लेखापरिक्षण छाननीत असे आढळून आले की यामधील बऱ्याच व्यक्ती (६६) पत्रकार नव्हत्या व ते सरकारी कर्मचारी होते.

डेक्कन ओडिसीच्या कार्यन्वयासाठी कंपनीने भाडयाने घेतलेल्या बसेसवर रु. १५.६३ लाख खर्च केले होते. भाडयाने घेतलेल्या बसेस या स्पर्धात्मक नोंदी मागवून दिर्घकालावधीसाठी घेण्यांत आल्या नव्हत्या अशा रितीने, बसेस भाडयाने घेण्यामध्ये स्पर्धात्मक दरांची खात्री करुन घेण्यात आली नव्हती.

व्यवस्थापनाने म्हटले होते (जुलै, २००६) की वाहतूक सेवेसाठी निविदा मागविण्यात येतील.

ही बाब शासनाला कळविण्यात आली (मे २००६) होती. उत्तर मिळाले नव्हते. (डिसेंबर २००६)

डेक्कन ओडिसीच्या तिकीटावर आरक्षण अभिकर्त्यांना (ऐजन्टंसना) १०% पेक्षा जादा कमिशन देण्यात येवू नये.

कोणत्याही नवीन सेवेला उत्तेजन देतांना वाणिज्यिक कारणास्तव कमीतकमी खर्च करण्यात यावा.

१.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टिकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमुद केले की,

"रुपये ६६.९९ लाखाचा तोटा" हा परिच्छेद आर्थिक वर्षे २००४-०५ या कालावधीतील आहे. उत्तरात असे नमूद करण्यात येते की, महामंडळाची स्वत:ची वेब साईट सुरु करण्यात आली असली तरी त्यावर डेक्कन ओडीसीसाठी ऑन लाईन आरक्षण सुविधा उपलब्ध नव्हती. त्यामुळे आरक्षण मिळविण्यासाठी आरक्षण अभिकर्ता हेच एकमेव माध्यम उपलब्ध होते.

त्यानंतर २००६-०७ पासूनच्या मौसमात डेक्कन सोडिसी आरक्षणासाठी ऑन लाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली. जरी म.प.वि.म वेबसाईटचे प्रचालन छापील माध्यम तसेच आंतरराष्ट्रीय जत्रेमार्फत कष्टपूर्वक करीत असून सुध्दा आतापर्यंत फक्त एकच ऑन लाईन आरक्षण मिळाले आहे. मागील अनुभवावरुन असे दिसुन आले आहे की, आंतरराष्ट्रीय कंपन्या तर्फे पूर्वनियोजित सहलीमधून पर्यटक भारत भेटीवर येतात व डेक्कन ओडीसीतील

प्रवास हा त्या भारतभेटीचा एक भाग असतो. काही गट फक्त डेक्कन ओडीसीतील प्रवासासाठी भारतात येतात आणि काही गट ट्रेनच्या थोडक्या प्रवासात सामील होतात म्हणजे गोव्यापासून येथे असे नमूद करण्यात येते की, परदेशी प्रवासाच्या नियोजनात अनेक बाबी अंर्तभूत आहेत उदा. पासपोर्ट, व्हिजा, प्रवासाची आखणी, आंतरराष्ट्रीय/देशी विमानाच्या येण्याजाण्याची तिकीटे, विमानतळावरुन जाण्यायेण्यासाठी वाहतूक व्यवस्था, हॉटेल आरक्षण, स्थळदर्शन व्यवस्था/मार्गदर्शक/ट्रेन आरक्षण, परकीय चलन इत्यादी बाबीची प्रवास कंपन्या परदेश प्रवासात अंर्तभूत असलेल्या या सर्व व्यवस्थांची काळजी घेतात. यामध्ये डेक्कन ओडिसीच्या आरक्षणाचाही अंतर्भाव होतो. वरील सर्व बाबींसाठी आरक्षण अभिकर्ते मध्यवर्ती (Pivotal) भूमिका बजावतात. पर्यटक या सर्व सेवा एकाच छत्राखाली मिळणे पसंत करतात. तेव्हा आम्ही पुन्हा एकदा असे नमूद करु इच्छितो की, दलाली हा प्रचालन व आरक्षण याचाच एक भाग आहे. त्यामुळे डेक्कन ओडिसीच्या बाबतीत ऑन लाईन या एकाच माध्यमावर अवलंबून राहणे हे फारच धोकादायक ठरु शकते.

मान प्रवास (Complimentary) छाननीमधून असे म्हटले आहे की, बहूतेक पर्यटक हे पत्रकार नव्हते तर सरकारी कर्मचारी होते. त्यांची संख्या सर्व मिळून ३६ आहे.

बिगर पत्रकार म्हणून भेट देणारे प्रवासी हे भारतीय पर्यटन मंत्रालयाच्या विदेशातील कार्यालयाचे असून ते भारताचे आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचालन करण्यात महत्वाची भूमिका बजावतात. रेल्वे बोर्डाचे उच्चस्तरीय अधिकारी, रेल्वेच्या सेवांचे परिक्षण करण्यासाठी आले. मा. मंत्री (पर्यटन) आणि महाराष्ट्र शासनाचे उच्चस्तरीय अधिकारी हे प्रकल्प उभारणीमध्ये सक्रिय होते.

देशी सहल ऑपरेटर्सना सहलीचा प्रत्यक्ष अनुभव दिल्याने तिकीट विक्रीमध्ये वाढ होण्यास मदत होते.

असे नमूद करण्यात येते की, सर्व स्तरावरुन सामुदायिक प्रयत्न केल्यास अपेक्षित व इच्छित परिणाम साधणे शक्य होईल आणि याच हेतूने या व्यक्तींना प्रवासाची सुविधा करुन देण्यांत आली.

बसेस भाडयाने घेणेबाबत.

छाननीमध्ये नमूद केल्याप्रमाणे वाहतूक व्यवस्थेबाबत सन २००६ पासून निविदा पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ ही व्यावसायिक संस्था असून डेक्कन ओडिसी हा प्रकल्प वाणिज्यिक दृष्टया किफायतशीर करण्यासाठी आरक्षण करणाऱ्या संस्थाना अधिकाधिक कमिशन/सुट देवून ट्रेनचे आरक्षण वाढविणे हा मुख्य उद्देश आहे.

आरक्षण वाढले तरच प्रकल्प फायद्यात येईल, असे महामंडळास वाटते.

नविन प्रकल्पावर पणन, प्रचालन व प्रसिध्दीवर पणन, प्रचालन व प्रसिध्दीवर खर्च अपरिहार्य आहे. प्रसिध्दीशिवाय प्रकल्प ग्राहकांसमोर आणता येणार नाही. परिणामी प्रकल्प संवर्धनशिल होण्यास खुप कालावधी लागू शकतो. म्हणून नविन प्रकल्पावर पणन प्रचालनासाठी खर्च करणे अपरिहार्य आहे, असे महामंडळास वाटते. खर्चाचा आवाका प्रकल्पाच्या व्याप्तीनुसार कमी जास्त असू शकतो.

१.३ महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली.

१.४ साक्ष :

या संदर्भात समितीने शासनाच्या सचिवांची व महामंडळाच्या प्रतिनिधींची बुधवार दिनांक ५ मे, २०१० रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सुसाहयतः अहवालात (फेब्रुवारी २०१०) १० टक्के एवढी दलाली देण्याचे निश्चित केले असताना अभिकर्त्यांना १७ टक्के एवढी दलाली का देण्यात आली याबाबत विभागीय सचिवांनी विषद केले की, राजस्थान व कर्नाटक शासनाकडून चालविण्यात येणाऱ्या पर्यटन गाडयांना अनुक्रमे १७ व २३ टक्के कमीशन ट्रॅव्हल एजंटांना दिले जाते. डेक्कन ओडीसीत जास्तीत जास्त प्रवासी हे ट्रॅव्हल एजंटकडून मिळत असतात. सन २००४ साली याबाबत टाटा कन्सटल्सीने परिक्षण केले होते. त्यामध्ये मुळ मिळकतीच्या २० टक्के कमीशन प्रस्तावीत केले होते. राज्यस्थान रॉयलमध्ये क्षमतेच्या ३५ टक्के प्रमाण असून कर्नाटकातील गोल्डन चॅरिअटचे ३० टक्के व पॅलेस ऑन व्हील मधील ७४ टक्के प्रवाशांचे प्रमाण आहे. इंटरनेट द्वारे आरक्षणांची सुविधा दिल्यापासुन सन २००७-२००८ मध्ये इंटरनेटद्वारे ३ आरक्षण, सन २००८-०९ मध्ये ६ आरक्षण सन २००९-२०१० या वर्षामध्ये

एकही आरक्षण झाले नाही. सन २०१०-२०११ या चालू वर्षामध्ये एकच आरक्षण इंटरनेटद्वारे प्राप्त झाले आहे. बाकी साधारणतः ९८ ते ९९ टक्के आरक्षण हे बुकींग एजेंटद्वारे होते. गाडीचे प्रवासी वाढविण्यासाठी पर्यटन विकास महामंडळाकडून मिळालेल्या निधींच्या आधारे रोडशो तसेच देशात व परदेशात देखील गाडीची प्रसिद्धी करण्यांत आली होती. ९२ दुतावासातील अधिकाऱ्यांची एक बैठक एलीफंटा केव्हज या ठिकाणी ठेवण्यात आली होती व त्यांच्यामार्फत त्या त्या देशातील पर्यटक लोकांसाठी प्रसिध्द देण्याचा शासनामार्फत प्रयत्न केला होता. त्यामुळे प्रवासी संख्या वाढवण्यामध्ये मदत झाल्याचे विभागीय सचिवांनी मान्य केले. गोवा व केरळ सरकारच्या मानाने पर्यटनासाठी राज्य शासनाकडून अनुदान कमी मिळत असल्याने पर्यटन व्यवसाय वाढविण्यासाठी ज्यादा निधींची मागणी केल्याचे त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. सन २००४-२००५ व २००५-२००६ साली तसेच २००८-२००९ डेक्कन ओडिसीकडून पर्यटन विकास महामंडळास तोटा सहन करावा लागला होता. परंतु सन २००६-२००७, २००७-२००८ व २००९-२०१० या वर्षामध्ये महामंडळास फायदा झाला आहे.

'डेक्कन ओडीसीचा' प्रवास राज्याच्या साधारणतः एक चुतुर्थांश भागामधून होत असल्याने व कोकण, गोवा, औरंगाबाद प्रवासासह ताडोबा सारख्या भागाचा प्रवासामध्ये समावेश झाल्याने प्रवाशांची संख्या पुर्णपणे असल्याचे त्यांनी प्रतीपादन केले. ज्यावेळी प्रवाशी संख्या पुर्ण नसेल त्यावेळी मागणी केल्यामुळे चार्टर्ड टूर ऑपरेटर्सना गाडी भाडयाने दिली जाते, त्यामुळे काही कालावधीमध्ये महामंडळास त्याचा फायदा देखील झाला होता. परदेशी पर्यटक नसतील त्या कालावधीमध्ये तिकीटांचा दर कमी करुन स्थानिक लोकांकरीता या गाडीचा उपयोग करता येईल का असा समिती सदस्यांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी विशद केले की, असा प्रयोग आतापर्यंत केलेला नाही. परंतु याबाबत शक्यता पडताळून अहवाल तयार करु व त्यावर निर्णय घेता येईल.

भारतीय लोकांसाठी हिन्दी, महाराष्ट्रातील लोकांसाठी मराठी व परदेशातील लोकांसाठी त्याच्या स्थानिक प्रचलीत असलेच्या भाषेमध्ये पर्यटन विकास महामंडळाने संकेत स्थळ (Website) तयार केल्यास अधिक पर्यटक मिळण्यास त्याचा फायदा व महाराष्ट्रातील लोकांसाठी महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांच्या समावेश करुन गाडीचा मार्ग तसा असल्यास भारतातील व महाराष्ट्रीय पर्यटकांना देखील त्याचा फायदा अधिक प्रमाणात होईल. या समिती

सदस्यांच्या प्रस्तावावर विभागीय सचिवांनी सुचना महत्वाची असून जरुन विचार करण्यात येईल असे आश्वासन दिले त्यामुळे गाडीच्या एकंदरीत पर्यटनासाठी लागणाऱ्या इतर अन्य सोई-सुविधा याबाबत विचार करुन व स्थानिक प्रकारातील भोजन व्यवस्था व इतर सांस्कृतिक कार्यक्रम याचा समावेश करावा व सोईच्या दृष्टीने आर्थिक बाबीचा देखील विचार करुन त्याप्रमाणे प्रस्ताव तयार करावा या समितीप्रमुखांच्या सुचनेवर विभागीय सचिवांनी या प्रकरणी विचार करुन समितीला माहिती देण्याचे मान्य केले.

महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायाबाबत बोलताना विभागीय सचिवांनी विशद केले की, महाराष्ट्रातील असलेले पर्यटन स्थळे सशक्त करुन मूलभूत सोयी सुविधा युक्त करणे अत्यंत महत्वाचे आहे. याबाबत सन २०१०-२०११ मध्ये बृहत आराखडा तयार करण्यात येत असून यामध्ये प्रथम ८ ते १० प्रमुख पर्यटन स्थळ विकास करण्यासाठी घेण्यात येणार आहेत. 'डेक्कन ओडिसीला' देखील टू टायर एसी व्यवस्था करुन भारतीय पर्यटकांची सुविधा करिता येईल याबाबत देखील पुढील काळामध्ये विचार करु असे एका प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी सांगितले. केद्र शासनाकडून बाराव्या वित्त आयोगामधून कोस्टल एरियासाठी निधी प्राप्त होतो. त्यानुसार कोस्टल एरियामध्ये ६ जिल्हे येतात. त्या जिल्हचा मास्टर प्लॅन तयार करण्याचे काम चालू आहे. मागील काळामध्ये १८७ कोटी रुपयांच्या निधी प्राप्त झाला होता. त्यापैकी २२ कोटी रुपये खर्च झाले. सी आर झेड कायद्याच्या बंधनामुळे निधी पुर्ण खर्च होऊ शकला नाही असे व्यवस्थापकीय संचालकानी एका प्रश्नाच्या उत्तराद्वारे स्पष्ट केले. राज्य सरकारास केद्राकडून मिळणाऱ्या निधी टप्या-टप्याने दिला जातो. तो निधी खाजगीकरणाच्या माध्यमातून विभाग विकसीत केल्यास मोठया प्रमाणावर व एकत्रित निधी मिळू शकेल, या सुचनेवर अशा प्रकारे विकसीत करण्याचा विचार असल्याचे विभागीय सचिवांनी विशद केले. आगामी होणाऱ्या होणाऱ्या संचालकांच्या बैठकीमध्ये याचा विचार करण्यांत येईल असे विभागीय सचिवांनी साक्षीच्या शेवटी स्पष्ट केले.

१.५ अभिप्राय व शिफारशी :

याप्रकरणी समितीला मिळालेली लेखी माहिती व तोंडी माहिती यावरुन असे दिसुन येते की, 'डेक्कन ओडीसी' प्रवासी रेल्वे गाडी की जी महाराष्ट्र शासनाकडून राज्यातील पर्यटन

व्यवसायास अधिक चालना मिळण्यासाठी पर्यटन विकास महामंडळाकडून सुत्र संचालन करण्यासाठी तयार करण्यात आली होती. त्यामध्ये प्रथमत: पर्यटन विकास महामंडळाला व्यवसायाच्या अनुभवा अभावी फार तोटा सहन करावा लागला होता. सन २००४-०५ या कालावधीमध्ये व्यवसाय तोटयामध्ये असताना डेक्कन ओडीसीमध्ये प्रवासी आरक्षण करण्यासाठी सुसाहय अहवालानुसार आरक्षण अभिकर्त्याला एकूण प्रवास किमतीच्या १० टक्के ठरवून देण्यात आलेली रक्कम देणे अपेक्षीत असताना जास्त म्हणजे १७ टक्के देण्यात आली. भारतामध्ये राजस्थान व कर्नाटक या राज्यामध्ये चालविण्यात येणाऱ्या पर्यटन रेल्वे गाडयांच्या बाबतीमध्ये प्रवाशांच्या आरक्षणासाठी आरक्षण अभिकर्त्याला महाराष्ट्रापेक्षा जास्त रक्कम दिली जाते. व त्यामुळे प्रवासी संख्या वाढण्यास मदत होते. असे महामंडळाने केलेले समर्थन हे न पटणारे आहे. महामंडळाचा व्यवसाय तोटयामध्ये असताना असे करणे अत्यंत अवाजवी होते. आरक्षण अभिकर्त्याला जादा अधिक सात टक्के रकमेचे केलेले वाटप देणे हे योग्य नव्हते हे शासनाच्या व्यापारी व वाणिज्यिक धोरणाशी सुसंगत नव्हते. व्यवसाय तोटयात असताना अशा प्रकारे शासनाच्या धोरणाची पायमल्ली होणे अत्यंत खेदजनक आहे. महालेखाकारांनी इंटरनेटच्या सोई सुविधा असताना आरक्षणाची पध्दत न अवलंबिल्याबाबत खेद व्यक्त केला. प्रत्यक्ष इंटरनेटद्वारे आरक्षण अत्यंत अत्यल्प मिळाले होते हे जरी खरे असले तरी, ठरलेल्या निकषानुसार आरक्षण अभिकर्त्याला दलाली द्यावयास पाहिजे होती.

एकंदर अनुभव लक्षात घेऊन पुढील काळामध्ये धोरणात्मक बदल करुन फायदेशीर बाबींचा विचार करुन भविष्यकाळामध्ये ते करणे अधिक उचित होईल. या करिता समिती अशी शिफारस करते की, शासनाच्या धोरणानुसार शासकीय उपक्रमांच्या बाबत व्यापारी व वाणिज्यिक तत्वांचा पुर्ण वापर करुन महामंडळ तोटयात असतांना ठरलेल्या रकमेपेक्षा अधिक दलाली देणे हे संयुक्तीक नव्हते. अशा बाबींचा पुढील काळामध्ये विचार करावा व तसा धोरणात्मक बदल करुन महामंडळास कुठलाही तोटा होणार नाही याचा प्राथम्याने विचार करुन निर्णय घ्यावा व तशी अंमलबजावणी करावी. महामंडळाकडून आरक्षणाबाबत संपुर्णत: आरक्षण अभिकर्त्यावर अवलंबुन राहणे. चुकीचे आहे. आजच्या आधुनिक काळामध्ये प्रसिद्धी व प्रचाराच्या अनेक सुविधा आहेत. इंटरनेट सुविधा, भ्रमणध्वनीद्वारे एस.एम.एस करुन प्रसिद्धी व प्रचार करण्यासाठी महामंडळाकडून काही प्रयत्न करण्यांत आले असले तरी महामंडळास

फायदेशीरदृष्टया सक्षम होण्याच्या दृष्टीने इंटरनेट आणि संगणक याचा अधिक कार्यक्षमपणे उपयोग करावा. आरक्षण सुलभ करुन भारतील व महाराष्ट्रातील प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी समितीमधील चर्चेनुसार महामंडळाने आपले संकेतस्थळ अत्यंत प्रभावशाली करुन विविध योजना तयार करणे गरजेचे आहे.

भारतातील पर्यटकांसाठी हिन्दी भाषेमध्ये व मराठी पर्यटकांसाठी मराठी भाषेमध्ये व परदेशातील पर्यटकांसाठी ज्या भागापासुन पर्यटक 'डेक्कन ओडीसीस' भेट देत असतील ते देश तसेच इतर देशातील भाषेमध्ये संकेतस्थळे त्या त्या स्थानिक भाषेमध्ये विकसीत करावीत. तसेच परदेशामध्ये देखील आरक्षण करण्याची सुविधा दिल्यास व्यवसाय अधिक फायदेशीर ठरण्याची शक्यता अधिक आहे. पर्यटन व्यवसायाच्या दृष्टीने 'डेक्कन ओडीसीमध्ये' पर्यटक ज्या काळामध्ये परदेशी पर्यटक कमी असतात. त्यावेळी भारतीय पर्यटकांना संधी देऊन व्यवसाय फायदेशीर होण्यासाठी महामंडळाकडून तिकीट दरामध्ये सवलत देवून महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटन स्थळाचा समावेश करुन अधिक सोई व सवलती उपलब्ध करुन पर्यटकांना आकर्षित केल्यास महामंडळास अधिक नफा मिळू शकेल. टुर्स आपरेटर्स द्वारे भाडे तत्वावर चालविण्यात येणाऱ्या व्यवसायापेक्षा असा व्यवसाय अधिक फायदेशीर होतो की नाही याची पडताळणी करावी व तसा आपल्या पर्यटन व्यवसयाच्या धोरणामध्ये बदल करावा जेणेकरुन स्थानिक पर्यटकांना देखील त्याचा अधिक फायदा मिळू शकेल.

महाराष्ट्र पर्यटन व्यवसाय अधिक संमृध्द होण्यासाठी केद्रशासनाकडून मिळणारा निधी जास्तीत जास्त प्रामाणामध्ये मिळण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या कायदयाच्या चौकटीमध्ये त्याचे आरेखन करुन पर्यटन स्थळांचा विकास साधावा. यासाठी जरुर पडल्यास खाजगी व्यवसायीकांना सामवून घेऊन तत्परतेने विकास होईल याकडे अधिक लक्ष घ्यावे की जेणेकरुन यापुर्वी केंद्राकडून देण्यात आलेल्या निधी अखर्चिक राहून परत करावा लागला होता. म्हणून यासाठी शासनाकडून देखील महामंडळास महाराष्ट्राचा पर्यटन व्यवसायास अधिक चालना देण्यासाठी गरज पडल्यास व आवश्यक ठिकाणी अधिक निधी द्यावा. जेणे करुन अप्रत्यक्षरीत्या स्थानिक रोजगार निर्माण होण्यास त्याची मदत होईल.

समितीने सुचविलेल्या उपरोक्त शिफारशीचा शासकीय व महामंडळस्तरावर विचार करुन जरूर पडल्यास धोरणात्मक निर्णय घेऊन कार्यवाही करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित

एक : माहितीपत्रके / भिंतीपत्रके छपाईवरील वायफळ खर्च

२.१ : भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक ४ मधील परिच्छेद क्रमांक ४.१ मध्ये "माहितीपत्रके / भिंतीपत्रके छपाईवरील वायफळ खर्च" यासंदर्भात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की,

कंपनीने माहितीपत्रके / भिंतीपत्रके छपाई यावर रुपये ४९.०५ लाख वायफळ खर्च केला होता. जरी पूर्व-व्यवस्थापकीय संचालकाविरुध्द, दोषासाठी प्रशासकीय चौकशी करण्यात आली होती, परंतु शासनाने त्यांच्या विरुध्द कोणतीही कारवाई केली नव्हती.

आर्थिकदृष्टया कमकुवत वर्गासाठी कंपनीने हाती घेतलेल्या विविध योजनांची जाहिरात करण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाने (बीडीओ) माहितीपत्रके, कर्जाचे अर्ज, भिंतीपत्रके छापण्याचे ठरविले (जून २००३) संचालक मंडळाने असेही ठरविले होते की, छपाईचे काम निविदा मागवून करण्यात यावे व माहितीपत्रक / भिंतीपत्रकावर फक्त स्वर्गीय अण्णासाहेब पाटील यांचेच छायाचित्र छापण्यात यावे.

लेखापरीक्षण छाननीत खालील बाबी निदर्शनास आल्या :-

१. व्यवस्थापकीय संचालकाने किती माहितीपत्रके / भिंतीपत्रकांची आवश्यकता आहे हे निर्धारित न करता निविदा मागविण्याऐवजी देकारांच्या आधारावर छपाईकारांना कामाचे नियतवाटप (मार्च-जून २००४) केले होते. कंपनीने २००४-०५ मध्ये ३.५० लाख माहितीप्रत्रके (रुपये २५.५० लाख) तीन लाख भिंतीपत्रके (रुपये २३.५५ लाख) व अर्जाचे फॉर्म (रुपये २.२५ लाख) अनुक्रमे मोना प्रिन्टर्स, मुंबई जोर्तिलिंग रुलिंग वर्क्स, मंबई व एस.व्ही. प्रिन्टर्स, मुंबई यांच्याकडून छापून घेतले व त्यांना रुपये ५१.० लाखाचे प्रदान केले होते.

२. संचालक मंडळाच्या निर्देशांचे उल्लंघन करुन (जून २००३) इतर महत्वाच्या व्यक्ती / अध्यक्ष यांची छायाचित्रे माहितीपत्रके / भिंतीपत्रके यांच्यावर ठळकपणे छापली होती. विधानसभा निवडणूकीनंतर (नोव्हेंबर २००४) राज्य शासनामध्ये बदल झाल्यामुळे छपाई केलेली माहितीपत्रके / भिंतीपत्रके वापरण्यायोग्य राहिली नव्हती.

३. सामानाची / प्राप्ती व जारी करण्याबाबतची कोणतीही नोंदवही कंपनीने ठेवली नव्हती त्याच्या अभावामुळे किती सामान प्रत्यक्षपणे प्राप्त झाले होते, किती क्षेत्रीय कार्यालयांना पाठविण्यात आले याबाबत तपासणी / खात्रीकरुन घेणे शक्य झाले नव्हते.

राज्य शासनाच्या सांगण्यावरुन (फेब्रुवारी २००५) आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी पूर्व व्यवस्थापकीय संचालकांची चौकशी केली होती. (फेब्रुवारी, २००५) व चौकशी अहवाल शासनास सादर केला होता (जुलै, २००५) चौकशी अहवालामध्ये पूर्व व्यवस्थापकीय संचालकाला वायफळ खर्चासाठी पूर्णपणे जबाबदार धरण्यात आले होते. तरीही त्यांच्यावर आतापर्यंत (ऑगस्ट २००७) कोणतीही कार्यवाही करण्यात आली नव्हती.

शासनाने म्हटले होते (ऑगस्ट २००७) की, हे प्रकरण त्यांच्या स्तरावर कारवाई करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाकडे पाठविण्यात आले होते. याबाबतची पुढील प्रगती प्रलंबित आहे (सप्टेंबर २००७).

अशारितीने, वर दर्शविलेल्या कारणांमुळे रुपये ४९.०५ लाखाचा खर्च वायफळ ठरला होता. ही बाब व्यवस्थापनाला कळविण्यात (जून २००७) आली होती. त्यांचे उत्तर प्रलंबित आहे (नोव्हेंबर २००७)

<u>२.२</u> : याप्रकरणी समितीला पठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले की,

१. पाहणी अहवालातील निरीक्षणे सर्वसाधारणपणे बरोबर आहेत माजी व्यवस्थापकीय संचालकांनी त्यांच्या स्पष्टीकरणात असे नमूद केले आहे की, विविध ठिकाणी घेण्यात आलेल्या

मेळाव्यात प्रत्येकी १.२५ लाख माहितीपत्रके व भिंत्तीपत्रकांचे विवरण करण्यात आले आहे. तसेच, ३०.००० माहितीपत्रके व भिंत्तीपत्रकेही महामंडळाला भेट देणाऱ्या व्यक्तीस वितरीत करण्यात आलेली आहे. श्री. प्रमोद चव्हाण, माजी व्यवस्थापकीय संचालक यांनी २००५ मध्ये दिलेल्या जबाबासह छपाईची पोच पावती उपलब्ध करुन दिलेले आहेत.

२. श्री. प्रमोद चव्हाण, माजी व्यवस्थापकीय संचालक यांना प्रत्यार्पित केल्यामुळे निरीक्षण अहवालानुसार त्यांच्याविरुध्द करावयाच्या पुढील चौकशीच्या कार्यवाहीसाठी सर्व माहिती व अभिलेखे शासनास पाठविण्यात आले. आता महामंडळाच्या स्तरावर कोणतीही कार्यवाही प्रलंबित नाही.

<u>२.३</u> : महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली व पुढील प्रमाणे अभिप्राय व्यक्त केले.

१. श्री. प्रमोद चव्हाण, माजी व्यवस्थापकीय संचालक यांनी केलेल्या अनियमिततांबाबत आयुक्त (रोजगार व स्वयंरोजगार) यांनी सन २००८-०९ मध्ये चौकशी केली होती. त्या चौकशीमध्ये महालेखापालांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांचा समावेश आहे. सदर चौकशी अहवालाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत :-

महालेखापालांनी देकारांच्या आधारावर केलेले छपाईचे काम व सामानाची नोंदवही न ठेवण्याबाबत घेतलेला आक्षेप योग्य आहे.

चौकशी अहवालाप्रमाणे महालेखापालांनी उपस्थित केलेल्या अन्य मुद्दयांबाबत, तत्कालीन परिस्थितीमुळे श्री. चव्हाण यांना जबाबदार ठरविणे योग्य होणार नाही.

चौकशी अहवालाच्या निष्कर्षांना शासनाची सहमती आहे.

२. शासनाने प्रथमतः श्री. चव्हाण यांना त्यांच्या मूळ आस्थापनेवर पाठविले आहे. शासनाने याबाबत महामंडळाने योग्य काळजी व दक्षता घेण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

३. आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार यांचा चौकशी अहवाल हा श्री. चव्हाण यांचे नियुक्ती प्राधिकारी म्हणजे वि.जा.भ.ज. महामंडळाला पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेला आहे.

२.४ साक्ष :

समितीने मिळालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सचिव तसेच अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ यांचे प्रभारी व्यवस्थापकीय संचालक व माजी व्यवस्थापकीय संचालक यांची बुधवार, दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी साक्ष घेतली. आर्थिक दृष्टया कमकुवत वर्गातील विविध योजनांची जाहिरात करण्यासाठी संचालक मंडळाने जून, २००३ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार भित्तीपत्रके छपाईचे काम करण्याचे ठरले. त्यासाठी निविदा मागवून काम करावे व पत्रकाच्या माहितीच्या पृष्ठावर स्वर्गीय अण्णासाहेब पाटील यांचेच छायाचित्र छापण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला असताना तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी छपाईचे नियत वाटप जून, २००४ मध्ये म्हणजे एक वर्षाच्या कालावधीनंतर का देण्यात आले होते, या समितीकडून विचारण्यात आलेल्या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी सर्व प्रथम सांगितले की, त्यांच्या उत्तराने समितीचे समाधन होईल की नाही हे सांगू शकत नाही परंतु अशा प्रकारे माहिती पत्रके व भित्तीपत्रके छापण्यात आली होती. या अनुषंगाने दोन वेळा चौकशी करण्यांत आलेली आहे. महालेखाकारांनी आक्षेप घेतल्यानंतर प्रथम तत्कालीन रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे आयुक्त यांनी व आता विद्यमान रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे आयुक्त यांनी चौकशी केली आहे. त्यांच्या चौकशी अहवालानुसार चौकशी अहवाल मान्य करुन पुढील कार्यवाहीसाठी तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक कार्यरत असलेल्या विमुक्त जाती भटक्या जमाती महामंडळद्वारे कार्यवाही करण्यासाठी पाठविण्यात आला आहे व पुढील काळात योग्य काळजी व दक्षता घेण्याबाबत शासनाने महामंडळास सुचना दिलेल्या आहेत. एकूण माहितीपत्रके /भितीपत्रके किती छापण्यात आली होती या समिती सदस्यांच्या प्रश्नासाठी विभागांच्या सचिवांनी सांगीतले की, ६ लाख पत्रके व पोस्टर्स छापण्यात आली होती व ती रोजगार व स्वयंरोजगार मेळाव्यामध्ये वाटण्यासाठी ठेवण्यात आली होती. असे किती मेळावे आयोजित करण्यांत आले होते. या समिती सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी सांगितले की, मेळाव्यामध्ये १ लाख २५ हजार माहितीपत्रके वाटण्यात आली व ३० हजार भित्तीपत्रके लावण्यात आलेली आहेत. सन २००२-०३ साली शासनास ६ कोटी रुपये व २००३-०४ साली ७ कोटी रुपये भाग भांडवल देण्यात आले त्यापैकी ५० लाख रुपये माहितीपत्रके व भित्तीपत्रके

छपाईसाठी खर्च केले होते. या समितीप्रमुखांच्या प्रश्नास उत्तर देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, त्याची संपूर्ण माहिती नाही. याबाबतची माहिती घेऊन ती समितीला सादर करण्यासाठी वेळ देण्यात यावा. जे मेळावे घेण्यात आले होते त्यापेक्षा जास्त पत्रके छापण्यात आली होती असे दिसून येते. त्यामुळे महालेखाकारांचे मुद्दे असल्याबाबत दुसऱ्या एका प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले.

२.५ : अभिप्राय व शिफारशी

आर्थिक दृष्टया कमकुवत वर्गासाठी कंपनीने हाती घेतलेल्या विविध योजनांची माहिती होण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाने माहितीपत्रके व भित्तीपत्रके छपाईबाबत संचालक मंडळामध्ये जून, २००३ निविदा मागवून छापावीत असा निर्णय घेतला होता व मुख्यपृष्टावर फक्त स्वर्गीय अण्णासाहेब पाटील यांचेच छायाचित्र छापावे असाही निर्णय घेतला होता. परंतु प्रत्यक्ष छपाईचे काम देताना देकारावर छापण्यासाठी तीन विविध छपाई कंपनीला मार्च-जून, २००४ मध्ये छपाई करण्यासाठी कामाचे वाटप करण्यात आले होते. व त्या माहितीपत्रकांवर / भित्तीपत्रकांवर स्वर्गीय अण्णासाहेब पाटील यांच्या व्यतिरिक्त पदाधिकारी असलेल्या व्यक्तींची छायाचित्रे देखील छापण्यात आली. "समितीपुढे आलेल्या माहितीमध्ये महालेखाकारांनी आक्षेप घेतल्यानंतर तत्कालीन व विद्यमान रोजगार व स्वयंरोजगार आयुक्त यांनी चौकशी केली असता महालेखाकारांनी घेतलेल्या मुळ आक्षेपानुसार तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी ती पत्रके छापण्यासाठी आपल्या अधिकारामध्ये निर्णय घेतला होता असे समितीस देखील दिसून आले" व त्यास विभागीय सचिवांनी देखील पुष्ठी दिली. याबाबत महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपानुसार यामध्ये गैरप्रकार झाला हे उघड सत्य आहे. छापण्यात आलेली माहितीपत्रके / भित्तीपत्रके मेळाव्यास उपस्थितीत असलेल्या व्यक्ती व वाटण्यात आलेली पत्रके यांची आकडेवारी दर्शविणारे कुठलेही दस्तएवज उपलब्ध नव्हते. परंतु अशी माहिती उपलब्ध असल्यास समितीला नंतर सादर करण्यांत येईल हे देखील विभागीय सचिवांनी मान्य केले. वास्तविकमहालेखाकारांनी आपल्या आक्षेपामध्ये सामानाची प्राप्ती व जारी करण्याबाबत नोंदवही नसल्याबाबत घेतलेल्या आक्षेपानुसार बैठकीमध्ये त्याचे स्पष्टीकरण होणे अत्यंत गरजेचे होते. एकंदरीत विभागीय सचिवांनी महालेखाकरांचे मुद्दे मान्य केले असल्याने व

रोजगार व स्वयंरोजगार आयुक्त यांच्या चौकशीमध्ये तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक दोषी असल्याचे आढळून येत असल्याने व त्याबाबतचा चौकशी अहवाल शासनाकडून तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक कार्यरत असलेल्या मुळ कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविला असल्याने या प्रकरणी संबंधीतांवर अधिक वेळ न घालविता नियमानुसार कार्यवाही व्हावी जेणेकरुन भविष्यात असे प्रकार घडणार नाहीत व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी.

३.१ : सर्वसाधारण मुल्यमापन

आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित यांच्या कामकाजा संबंधातील आढावा घेण्यासाठी बुधवार, दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी साक्ष घेण्यात आली होती. महामंडळाकडून सादर कण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने आढावा संबंधात माहिती विशद करताना महामंडळाचे माजी व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की,

विभागीय सचिवांनी सांगितले की, आर्थिकदृष्ट्या मागासेल्या गटातील युवकांना स्वयंरोजगारासाठी अर्थ सहाय्य व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने दिनांक २७/११/१९९८ रोजी कंपनी कायद्याखाली नोंदणीकरुन अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना केली व महामंडळाचे सन २००९-२०१० पर्यंत भाग भांडवल एकूण ५० कोटी आहे. महामंडळाच्या प्रामुख्याने एकूण तीन योजना होत्या व त्याद्वारे आतापर्यंत १२, ३८३ लाभार्थ्यांना महामंडळाकडील तीन योजनेतून लाभ मिळाला असून आता थेट कर्ज योजना बंद करण्यांत आलेली आहे व आतापर्यंत जवळजवळ १७ कोटी रुपयांचे कर्ज वाटप झालेले आहे. महामंडळास आतापर्यंत तोटा झालेला नाही. याबाबत मा. समितीप्रमुखांनी नफयाबाबतचे अर्थकारण समितीला समजावून सांगण्याची विनंती केल्यानंतर माजी व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, महामंडळाकडून मोठया प्रमाणात कर्ज दिलेले नाही. वसुलीची टक्केवारी ५० टक्कयांपर्यंत आहे. त्यामुळे महामंडळास तोटा झालेला नाही. २५ हजाराच्या अर्थसहाय्यावर ४ टक्के व्याज आकारणी केली जाते व त्यावरील जास्त रकमेचा कर्जावर ६ टक्के आकारणी केली जाते. कर्जावरील व्याजातून खर्च भागविला जातो महामंडळास शासनाकडून ५० कोटी रुपये भाग भांडवल मिळाले आहे. त्यावर मिळणाऱ्या

व्याजातून महामंडळाचा खर्च भागविला जातो काय ? या समितीप्रमुखांच्या विचारलेल्या प्रश्नावर माजी व्यवस्थापकीय संचालकांनी सांगितले की, भागभांडवलाच्या व्याजातून प्रशासकीय खर्च भागवित जातो. महामंडळास सन १९९८-९९ मध्ये ५ कोटी तसेच २००२-२००३ मध्ये ६ कोटी रुपये, २००३-२००४ मध्ये ७ कोटी रुपये, २००५-२००६ मध्ये १ कोटी रुपये, २००६-२००७ मध्ये १.५० कोटी रुपये २००७-२००८ मध्ये १.६५ कोटी रुपये, २००८-२००९ मध्ये २६.६० कोटी रुपये व २००९-२०१० मध्ये १.२५ कोटी रुपये असे एकूण ५० कोटी रुपयांचे भागभांडवल मिळाल्याचे एका प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी सांगितले. ५० कोटी रुपयामधून कर्जवाटप केलेली रक्कम वजा जाता इतर सगळे भागभांडवल ६ महिने, एक वर्ष, दोन वर्ष पध्दतीच्या मुदत ठेवीमध्ये बँकामध्ये ठेवण्यात आलेले आहेत जेणेकरुन जेवढे पैसे लागतील तेवढे पैसे सहज उपलब्ध होतील. यात महामंडळाला फीक्स डिपॉझिटमधून देखील व्याज मिळते.

सन २००१-२००२ मध्ये ११, २००२-२००३ मध्ये ३२ लाभार्थ्यांना कर्ज वाटप केलेले असून २००३-२००४ मध्ये १४८ लाभार्थ्यांना कर्ज वाटप केले, हे प्रमाण खुप कमी असल्याने महामंडळास कर्ज वाटपासाठी लाभार्थीच मिळत नाहीत हे खरे आहे काय ? या समिती सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना माजी व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, २००१-२००२ मध्ये महामंडळाकडे कोणतीही योजना मंजुर नव्हती. आतापर्यंत १२ हजार लोकांना कर्जाचा लाभ मिळाला असून गटप्रकल्प योजनेमध्ये लाभार्थ्यांची संख्या जास्त असते पण त्यामध्ये ग्रुप असतो असेही एका प्रश्नाच्या उत्तरादाखल विभागीय सचिवांनी स्पष्ट केले. महामंडळाचा सर्व कार्यक्रम एकंदरीत कामकाज पाहता महामंडळ लाभार्यांना कमी कर्ज वाटप करुन उर्वरीत भागभांडवल बँकेमध्ये मुदत ठेवीत ठेवून त्यावर मिळणाऱ्या व्याजामुळे महामंडळास नफा झाला आहे. ज्या उद्देशाने शासनाने महामंडळाची स्थापना केली त्याचे उद्दिष्ट कितपर्यंत साध्य झाले. या प्रश्नाला समितीला समाधानकारक उत्तर प्राप्त झाले नाही. कर्ज वसुलीच्या पध्दतीबाबत विचारणा केली असता कर्ज वसूलीसाठी पोस्टडेटेड चेकस् घेण्यात येतात. चेक न वठण्याचे प्रमाण ५० टक्के आहे. यासंदर्भात कोर्टामध्ये २ हजार अशी प्रकरणे दाखल आहेत असेही माजी व्यवस्थापकांनी एका प्रश्नाच्या उत्तरावर स्पष्ट केले. या विषयावर विभागीय सचिवांनी सांगितले की, नविन योजना राबवावयास पाहिजेत त्याप्रमाणे योग्य लाभार्थी निवड व्हावयास पाहिजे. वसुलीची जी यंत्रणा आहे व जी पध्दत आहे. त्यामध्ये

सुधारणा झाली पाहिजे. ही वस्तुस्थिती त्यांनी मान्य केली. सन २००८-२००९ मध्ये २५६ अर्जाना मंजूरी दिली असून ३८० अर्ज नामंजूर कण्यांत आले. १८ अर्ज प्रलंबित आहेत. बीज भांडवल योजनेअंतर्गत १७६ लाभार्थ्यांना कर्ज देण्यांत आले असून बाकीचे सर्व लाभार्थी गट प्रकल्प योजनेअंतर्गत कर्ज दिली आहेत. आतापर्यंत ८ हजार ९७६ लाभार्थ्यांना साधारणपणे ९० लाख रुपयांचे कर्ज वाटप केलेले आहे. एका गटाला साधारणपणे १ लाख ७८१ रुपयांचे वाटप केलेले आहे. असेही विभागीय सचिवांनी एका प्रश्नाच्या उत्तराबाबत सांगितले. महामंडळाकडील लाभार्थ्यांची संख्या कमी असल्याचे कारण काय या समितीप्रमुखांच्या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, साधारणपणे बँकाकडून लाभार्थ्यांना कर्ज दिले जाते. बँकाकडे प्रस्ताव सादर

झाल्यानंतर योग्य प्रस्तावास बँक मंजूरी देते. त्यामुळे लाभार्थ्यांची संख्या कमी प्रमाणामध्ये दिसून येते शासनाकडून सन २००८-०९ मध्ये एकदम २६.६० कोटी रुपये इतके भागभांडवल का दिले गेले याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, महामंडळास अधिक जोमाने काम व्हावे या करीता शासनाकडून मोठया प्रमाणात निधी देण्यात आला होता व भाग भांडवलाचा असलेला अनुशेष शासनाकडून पूर्ण केला गेला.

३.२ अभिप्राय व शिफारशी :

आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित याची स्थापना कंपनी अधिनियमानुसार राज्यातील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या जास्तीत जास्त संधी मिळण्यासाठी व निधीचे पाठबळ देवून संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने करण्यांत आली होती. महामंडळास शासनाकडून एकूण भाग भांडवल ५० कोटी रुपये इतके वेगवेगळया आर्थिक वर्षामध्ये स्थापनेपासून देण्यात आले होते.

महामंडळाने शासनाच्या १६ मार्च, २००० च्या मंजूरी आदेशानुसार बीज भांडवल कर्ज योजना व ६ ऑक्टोबर, २००६ च्या मंजूरी आदेशानुसार गट प्रकल्प कर्ज योजना सुरु केली होती. बीज भांडवल कर्ज योजनेतून सद्यस्थितीमध्ये ९०४ लाभार्थ्यांना ९,३५,१४,६४३ रुपयांचे वाटप करण्यांत आले आहे व गट प्रकल्प कर्ज योजनेतर्गत ७८१ गटांना की ज्यामध्ये लाभार्थ्यांची संख्या ८,९७६ इतकी असून त्यांना ९०,००,०००/- रुपये इतक्या रकमेचे कर्ज मंजूर केले गेले

आहे. थेट कर्ज योजना की जी योजना फक्त सन २००३-२००४ व २००४-२००५ या वर्षी राबविण्यात आली होती. त्यातील २, ४५३ लाभार्थ्यांना रुपये ६,१३,२४,९०० इतक्या रकमेची कर्ज वाटप केले होते. अशा प्रकारे महामंडळाकडून महामंडळाच्या स्थापने पासूनच्या कालावधीत एकूण १२,३३३ लाभार्थ्यांना एकूण १६,३८,३९,५४३ इतक्या रक्कमेचे कर्ज वितरण केले गेले होते. महामंडळाकडील ५० कोटी भाग भांडवल असतांना लाभार्थ्यांच्या संख्या पाहता आजपर्यंत महामंडळाचे कामकाज निराशाजनक असल्याचे साक्षीच्या वेळी समितीने नमूद केले होते. महामंडळ अथवा शासनस्तरातून महामंडळ निर्मितीचे उदिष्ट साध्य करण्यासाठी महामंडळाकडे असलेल्या भागभांडवलामधून महाराष्ट्रातील जास्तीत जास्त आर्थिक दुर्बल घटकास रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे आवश्यक होते , तथापि महामंडळाने फक्त गटप्रकल्प योजना, बीज भांडवल योजना व थेट कर्ज योजना राबविल्याचे समितीला दिसून आले. थेट कर्ज योजना नंतर बंद करण्यांत आली होती. त्यामुळे महामंडळाने नविन योजना राबविल्या पाहिजे होत्या त्याचा देखील समितीला अभाव दिसून आला यासाठी समिती अशी शिफारस करीत आहे की, राज्यातील आर्थिक दुर्बल घटकास रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी शासनाने महामंडळ स्तरावरील असलेल्या अडचणी लक्षात घेऊन योग्य ते मार्गदर्शन करावे व महामंडळ अधिक कार्यक्षम कसे करता येईल याचा विचार करावा. समितीसमोर आढाव्याच्या दृष्टीकोनातून सादर करण्यांत आलेल्या माहितीवरून समिती महामंडळाच्या एकंदरीत कामकाजाबाबत असमाधान व्यक्त करते. महामंडळास शासनाकडून सन २००८-२००९ मध्ये मोठयाप्रमाणात २६.६० कोटी इतके भाग भांडवल देण्यांत आले होते. परंतू महामंडळाकडून महामंडळाच्या स्थापनेपासून आतापर्यंत एकूण ७ कोटी भागभांडवल कर्जाऊ रकमेपोटी लाभार्थांना वितरित केले व बाकी ३३ कोटी रुपये महामंडळाकडून बँकेमध्ये गुंतवणूक म्हणून ठेवण्यात आली. तसेच वितरीत करण्यात आलेल्या कर्जमर्यादा वसूलीची टक्केवारी देखील ५० टक्के होती व त्यातील पोस्ट डेटेड चेक बाऊन्स होण्याच्या प्रमाणामुळे कोर्टामध्ये देखील २ हजार प्रकरणे दाखल करण्यात आली होती. या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करता महामंडळातर्फे दुर्बल घटक लोकांची आर्थिक उन्नती होण्यासाठी शासनाने घेतलेल्या निर्णय राबविताना अनास्था दिसून येते. शासनास राज्यातील विविध विकास योजना राबविण्यासाठी बाहेरील मार्गाने कर्ज उभारुन योजना पूर्ण कराव्या लागतात व दुसऱ्या बाजूला शासनाने दिलेले भागाभांडवल बँकेमध्ये

गुंतवणूक करुन महामंडळ व्याज घेण्यामध्ये धन्यता मानते याचे समितीला आश्चर्य वाटते. याप्रकरणी समिती महामंडळाच्या कामाबाबत आपली तिव्र नापसंती व्यक्त करते. व विभागाकडून या प्रकरणी लक्ष घालून महामंडळामध्ये महामडंळ स्थापनेमागील उदीष्ट कसे साध्य होईल याकरीता विविध पर्याय तपासून नविन योजना कार्यान्वित करुन जास्तीत जास्त रोजगाराच्या संधी कशा उपलब्ध होतील हे पाहणे गरजेचे आहे. या प्रकरणी केलेली कार्यवाही समितीला तीन महीन्याच्या आत कळविण्यात यावी. अशीही समिती शिफारस करीत आहे.

महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्या.

एक : अग्नीशामके खरेदीमधील जादा खर्च :

४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक ४ मधील परिच्छेद क्रमांक ४.२० मध्ये "अग्निशामके खरिदेमधील जादा खर्च" यासंबंधी महालेखाकारानी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की,

दराची योग्यता तपासण्यात अपयश आल्यामुळे अग्निशामके खरेदीमध्ये कंपनीला रु. १.८० कोटीचा जादा खर्च झाला होता.

शिक्षण विभागाने राज्यामधील शाळांमध्ये आगीमुळे होणारी दुर्घटना टाळण्यासाठी विविध सुरक्षा उपाय अंमलबजावणी करण्याचे ठरविले (जुलै, २००४) व त्यानुसार अग्निशामके खरेदी करण्यासाठी रुपये ११ कोटीचे वित्तीय सहाय्य मंजुर केले होते. (२००५-२००६), ही अग्निशामके कंपनीमार्फत खरेदी करण्याचेही ठरविले. त्यानुसार कंपनीने भारतीय मानक तपशीलानुसार दोन निविदांमध्ये १८,०५३ अग्निशामके खाली दर्शविलेल्या तपशीलानुसार खरेदी केली होती.

निविदा मागविल्याचा महिना	दिलेल्या पुरवठा आदेशांचा कालावधी	मिळालेला कमीत कमी दर (रुपये प्रति अग्निशामक)	पुरवठा-दाराची संख्या	प्रत्यक्ष खरेदी केलेली मात्रा (संख्ये मध्ये)	दराचा तपशील

नोव्हेंबर, २००४	१५ मार्च ते १३ मे, २००५	४,९५०	२	६,२७९	• एफओआर पोहचवणी ठिकाण आधारावर दर • निवेदेमध्ये सिलेंडर पुर्नभरणीची तरतुद नव्हती. पुरवठाकारांनी तीन वर्ष कालावधी-साठी विनामुल्य भरणी मान्य केली होती.
ऑगस्ट, २००५	मार्च, २००६ ते फेब्रुवारी, २००७	४,५१६	# ४	११७७४	अग्निशामक रु. ९७२ पुर्नभरणी आकारासह (म्हणजे) • रु. १,८०० + रुपये १,३६३ + रुपये ९७२ + रु. ३८१ प्रति अग्निशामक = ४,५१६ प्रती अग्निशामक पुढील तीन वर्षाच्या कालावधीसाठी दराच्या १५ टक्के रक्कम पुर्नभरणीसाठी राखून ठेवण्याच्या कराराच्या शर्तीनुसार तरतुद.
				१८,०५३	

- सिद्धी एन्टरप्रायजेस, रत्नागिरी (२,१७५ अग्निशामके) व मुरली टेक्नो प्रायव्हेट लिमिटेड, चिपळूण (४,१०४ अग्निशामके)
- रिलायबल फार इंजिनिअर्स, ठाणे ३७५ अग्निशामके, जिओ फायर रेमिडीजस प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई ४,२३९ अग्निशामके, अजय इंडस्ट्रीज, मुंबई ३२ अग्निशामके व युनिर्व्हसल इंजिनिअरींग कॉर्पोरेशन, मुंबई ७,१२८ अग्निशामके.

या संदर्भात लेखापरिक्षणास खालील बाबी निर्दशनास आल्या :-

- अपर्याप्त प्रसिद्धी म्हणजे रत्नागिरी/कोकण क्षेत्रामधील स्थानिक वर्तमान पत्रात मर्यादित प्रसिद्धीमुळे कोकणातील फक्त चार पुरवठाकरांनीच निविदेमध्ये सहभाग घेतला होता व प्रति अग्निशामकाचा रु. ४,९५०/- कमीत कमी दराची सुयोग्यतेची खात्री करणे शक्य झाले नव्हते. हे वर दर्शविलेल्या तक्त्यावरुन दिसून येते की त्याच आयएसआय तपशीलासाठी ऑगस्ट, २००५ या पुढच्या निवेदेमध्ये मिळालेल्या रु. ४,५१६/- प्रति अग्निशामके व दराशी तुलना करता हा दर प्रति अग्निशामक रु. ४३४ ने जास्त होता.
- कंपनीने स्विकारलेल्या दरांची योग्यता, महासंचालक पुरवठा व विल्हेवाट (डीजीएसअँडडी) नवी दिल्ली यांची आयएस तपशीलासाठी त्यांच्या दर करार (२००५-०६) मधील दर रु. १,१८२/- प्रति अग्निशामक (एफओआर नवी मुंबई व विक्रीकर वगळून) यांच्या दराशी तुलना लेखापरिक्षणाने निश्चित केली होती अशारितीने, कंपनीने दोन्ही निविदांमध्ये स्विकारलेला प्रति अग्निशामक रु. १,८०० हा दर डीजीएसअँडडी रु. १,१८२/- प्रति अग्निशामक या दरापेक्षा खूपच जास्त होता. असेही निर्दशनास आले की, एका पुरवठादाराने (रिलायबल फायर इंजिनिअर्स ठाणे) याच तपशीलाचे अग्निशामके डीजीएसअँडडी दराने पुरविली होती. त्यानेच रु. ४,५१६/- प्रति अग्निशामके या जास्त दराने कंपनीला पुरवठा केला होता. दोन्ही निविदामध्ये प्रत्यक्षात प्राषण करण्यात आलेल्या अग्निशामक दराच्या मूळ किंमतीशी तुलना करता कंपनीने रु. १.८० कोटीचा अतिरिक्त खर्च केला होता. (रु. २,१८१-रु. १,१८२ X १८,०५३ अग्निशामके)
- पुरवठादारांनी निवेदेमध्ये (नोव्हेंबर २००४) तीन वर्षापर्यंत विनामुल्य पुर्नभरणी होते. पुढील निविदामध्ये मिळालेल्या रु. ९७२ प्रति अग्निशामक या पुर्नभरणी दराने पुर्नभरणी आकार

रुपये ६१.०३ लाख एवढा काढण्यात आला होता. पुढील निवेदेमध्ये (ऑगस्ट २००५) कंपनीने प्रत्यक्षात पुर्नभरणी करण्यात आली की नाही याबाबत खात्री करुन न घेता प्रति अग्निशामक रु. ३७० या दराने रु. ४३.५७ लाखाचे पुर्नभरणी आकाराचे अग्रीम प्रदान केले होते.

अशा रितीने, भरपुर प्रसिद्धी देऊन निविदा न मागविणे, मिळालेल्या दराच्या योग्यतेची नीट तुलना न करणे यामुळे राज्याच्या करदात्यावर रु. १.८० कोटीचा जादा खर्च झाला होता व अग्निशामकाची पुर्नभरणी झाली की नाही याबाबत खात्री करुन न घेता रु. १.०५ कोटी अग्रीमाचे केलेले प्रदान यामुळे पुरवठादाराला अदेय फायदा देण्यात आला होता. ही बाब शासनाला/व्यवस्थापनाला कळविण्यात (जुलै, २००७) आली होती : त्याचे उत्तर प्रलंबित आहे. (नोव्हेंबर, २००७)

४.२. या प्रकरणी समितीला पाठविलेला स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमुद केले की,

ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचे पत्र दिनांक ०३.११.२००४ नुसार महामंडळाकडे ५ कि.ग्र. क्षमतेच्या अग्निशामक नळकांडयाचा पुरवठा करण्यासाठीचे दर देण्याबाबत विचारणा केली होती. महामंडळाने संचालक, जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांना दि.०८.११.२००४ नुसार अग्निशामक नळकांडयांच्या खरेदीकरिता दर मागविण्यासाठीची जाहिरात राज्यस्तरीय वृत्तपत्रात देण्याबाबत कळविण्यात आली होती. संचालक जनसंपर्क महासंचालनालय यांनी त्यांच्या प्रचलित चक्रिय पध्दतीने दि. ०६/११/२००४ रोजी दैनिक समानता व दि.०९/११/२००४ दैनिक रत्नभूमी या दोन दैनिकातून प्रसिध्द केली. महामंडळाने प्रसिध्द केलेल्या निविदा सूचनेची प्रत सर्व विभागीय कार्यालयांना पाठविण्यात येऊन ती महामंडळाच्या संकेत स्थळावर सुध्दा प्रसिध्द करण्यात आली होती. महामंडळाने निविदा सूचना प्रसिध्द केल्यानंतर एकूण ६ निविदा घटकांनी निविदा सादर केल्या होत्या. प्राप्त निविदेपैकी दोन उद्योग घटकांच्या निविदा या तांत्रिक दृष्टया अपात्र असल्यामुळे त्यांच्या निविदेचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला नव्हता. उर्वरीत चार उद्योग घटकांच्या निविदेचा व्यापारी लिफाफा उघडल्यानंतर त्यामध्ये प्राप्त झालेला कमीम कमी दर हा रु.४,९५०/- प्रती

नग एवढा होता. महामंडळाकडे प्राप्त कमीत कमी दर हे ग्राम विकास विभागास दि.२२/११/२००४ रोजी कळविण्यात आले. महामंडळामार्फत दिनांक ३१/१/२००५ व दि.४/२/२००५ रोजी सचिव, शालेय शिक्षण विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. महामंडळाने शालेय शिक्षण विभागास सादर केलेल्या प्रस्तावावर सदर विभागाने दि. २८/३/२००५ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्राथमिक शाळांमध्ये ४ टक्के सादील अनुदानातून अग्निशामक यंत्र रु.४,९५०/- प्रती नग प्रमाणे खरेदी करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला. या शासन निर्णयानुसार महाराष्ट्रातील विविध जिल्हा परिषद कार्यालयांनी ६२,२७९ अग्निशामक नळकांडयाच्या पुरवठयाचे आदेश महामंडळास दिले होते. ज्याची एकूण किंमत रु.३,१०,८१,०५०/- एवढी होती. शालेय शिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयामध्ये खालील अटींचा समावेश होता.

१. अग्निशामक यंत्राचा पुरवठा व उभारणी राज्यातील सर्व प्राथमिक शाळांमध्ये करावयाची होती.
२. अग्निशामक यंत्राचा पुरवठा केल्यानंतर ते हाताळणाऱ्यास त्यांच्या हाताळणीचे प्रशिक्षण घेणे आवश्यक होते.
३. पुरवठा करण्यात आलेल्या अग्निशामक नळकांडयामध्ये उभारणी केल्यानंतर तीन वर्षापर्यंत पावडरचा भरणा विनामूल्य करणे.
४. पुरवठा केलेल्या अग्निशामक यंत्राच्या त्रुटी (Manufacturing defects) साठी ५ वर्षाची हमी देण्यात आली होती.

शालेय शिक्षण व ग्रामविकास विभागास प्रस्ताव सादर करताना महामंडळाने रु.४,९५०/- एवढा निविदेत प्राप्त कमीत कमी दर कळविला होता. निविदेतील प्राप्त कमीत कमी दर कळविताना या दराची तुलना सार्वजनिक बांधकाम विभाग, रत्नागिरी यांची महामंडळास दिलेल्या आदेशातील दर रु. ४,९८०/- सोबत करण्यात आली होती. महामंडळाने दिलेल्या प्रस्तावित दरामध्ये वर अनु.क्र.१ ते ४ मध्ये नमुद केलेल्या अटींचा सुध्दा समावेश होता. सदर अटींचा सार्वजनिक बांधकाम विभाग, रत्नागिरी यांच्या आदेशातील दर रु.४,९८०/- मध्ये समावेश नव्हता.

शासन निर्णय दि.२८/३/२००५ मध्ये मंजूर केलेल्या रु.४,९५०/- दरामध्ये अग्निशामक नळकांडयाची उभारणी करणे, तीन वर्षाकरिता विनामूल्य पावडरचा भरणा करणे, अग्निशामक नळकांडयाच्या उत्पादनातील त्रुटींची पाच वर्षाची हमी तसेच अग्निशामक नळकांडयाचा वापर करणाऱ्यास हातळणीचे प्रशिक्षण देणे या अटींचा समावेश होता.

सदर शासन निर्णयानुसार महामंडळाकडे प्राप्त कमीत कमी दर रु.४,९५०/- प्रमाणे एकूण ६,४३७ नग अग्निशामक नळकांडयाचे पुरवठा आदेश महामंडळास प्राप्त झाले.

सन २००५-२००६ मध्ये शासकीय विभागांची मागणी लक्षात घेवून महामंडळाने राज्यस्तरीय नऊ वृत्तपत्रात भारतीय मानक चिन्हाकिंत नऊ वृत्तपत्रात भारतीय मानक चिन्हाकिंत अग्निशामक नळकांडे खरेदीसाठी निविदा प्रसिध्द केली होती. प्रसिध्द केलेल्या निविदा सूचनेची प्रत सर्व विभागीय कार्यालयांना पाठविण्यात येवून ती महामंडळाच्या संकेत स्थळावर सुध्दा प्रसिध्द करण्यात आली होती. महामंडळाने प्रसिध्द केलेल्या निविदेमध्ये एकूण २१ लघुउद्योग घटकांनी भाग घेतला. प्राप्त निविदेपैकी एकूण १२ लघुउद्योग घटकांच्या निविदा व्यापारी लिफाफा उघडयात आलेल्या निविदेमध्ये कमीत कमी रु.४,५१६/- प्रती नग एवढा दर प्राप्त झाला होता. या वर्षी प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेमध्ये मागील वर्षी शालेय शिक्षण विभागाने त्यांच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या खालील अटी व शर्तींचा समावेश करण्यात आला होता.

१. अग्निशामक यंत्राचा जागेवर पुरवठा व उभारणी करणे.
२. अग्निशामक यंत्राचा पुरवठा केल्यानंतर ते हाताहणाऱ्यास त्यांच्या हाताळणीचे प्रशिक्षण देणे.
३. पुरवठा करण्यात आलेल्या अग्निशामक नळकांडयामध्ये तीन वर्षापर्यात पावडरचा भरणा विनामूल्य करणे.
४. पुरवठा केलेल्या अग्निशामक यंत्राच्या उत्पादनातील त्रुटी (Manufacturing defects) साठी ५ वर्षाची हमी देण्यात आली होती.

महामंडळाने दिनांक २५/१०/२००५ रोजी सचिव शालेय शिक्षण यांना महामंडळाकडे प्राप्त न्यूनतम दराने अग्निशामक पुरवठा करण्याचा प्रस्ताव सादर केला होता. महामंडळाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार शालेय शिक्षण विभागाने शासन निर्णय क्र.पीआरई

२००६/(४५८२/०६)/प्रशि-१ दिनांक २९/३/२००६ नुसार एकूण रु.८.०० कोटी एवढया किंमतीची अग्निशामक यंत्रे खरेदीचा शासन निर्णय निर्गमित केला होता. सदर शासन निर्णयानुसार विविध जिल्हा परिषदांकडून महामंडळास एकूण ११,७७४ नग अग्निशामक नळकांडयाचे पुरवठा आदेश प्राप्त झाले. त्याची किंमत रुपये ५,३५,७१,३८४ एवढी होती.

भारताचे नियंत्रक व महालेखाकार यांनी त्यांच्या अहवालात नमूद केलेल्या आक्षेपावर खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे. घेऊन या दरासोबत निविदेतील प्राप्त कमीत कमी दरांची तुलना करुन दर ठरविण्यात आले. या व्यतिरिक्त महामंडळाने आले. या व्यतिरिक्त महामंडळाने शालेय शिक्षण विभागास प्रस्तावित केलेल्या दरामध्ये वर नमूद केलेल्या क्र.१ ते ४ या अटींचा समावेश असल्यामुळे दर ठरविताना या अटीसुध्दा विचारात घेण्यात आल्या होत्या.

हे खरे आहे की, भारतीय मानक चिन्हाकिंत अग्निशामक नळकांडयांचे सन २००५-२००६ मध्ये महामंडळाकडे प्राप्त झालेले दर हे सन २००४-०५ मधील प्राप्त दरापेक्षा रु. ४३४ ने कमी होते. सन २००५-०६ मध्ये एकूण २१ उद्योग घटकांनी निविदेत भाग घेतला होता. त्यापैकी १२ उघोग घटकांच्या व्यापारी लिफाफा उघडण्यात आला होता. सन २००५-०६ मध्ये जास्त लघुउद्योग घटकांनी निविदमध्ये भाग घेतला होता. त्यामुळे स्पर्धा होऊन मागील वर्षापेक्षा कमी दर प्राप्त झाले होते. तसेच निविदेत भाग घेणाऱ्या हे खरे आहे की, सन २००४-०५ करीता प्रसिध्द करण्यात आलेली निविदा सूचना ही रत्नागिरी व कोकण मधील स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. प्रसिध्द करण्यात आलेली निविदा सूचनेप्रमाणे जास्तीत जास्त उद्योगजकांनी भाग घेण्याकरिता या निविदेची प्रत महामंडळाच्या सर्व विभागीय कार्यालयांना पाठविण्यात आली होती. व निविदा सूचना महामंडळाच्या संकेत स्थळावरसुध्दा प्रसिध्द करण्यात आली होती. कोकण विभागाव्यतिरिक्त महामंडळाच्या इतर विभागीय कार्यालयांतर्गत अग्निशामक नळकांडयाच्या पुरवठा करणारे नोंदणीकृत लघुउद्योग नसल्यामुळे फक्त कोकण विभागातील लघुउद्योग घटकांनी या निविदेत भाग घेतला.

सन २००४-०५ मध्ये निविदेत प्राप्त दरांची निश्चिती करताना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, रत्नागिरी यांनी महामंडळास दिलेल्या आदेशातील दर रु.४,९८०/- याचा आधार घेऊन या दरासोबत निविदेतील प्राप्त कमीत कमी दरांची तुलना करुन दर ठरविण्यात आले. या व्यतिरिक्त महामंडळाने शालेय शिक्षण विभागास प्रस्तावित

केलेल्या दरामध्ये वर नमूद केलेल्या क्र. १ ते ४ या अटीचा समावेश असल्यामुळे दर ठरविताना या अटीसुध्दा विचारात घेण्यात आल्या होत्या. हे खरे आहे की, भारतीय मानक चिन्हाकिंत अग्निशामक नळकांडयांचे सन २००५-२००६ मध्ये महामंडळाकडे प्राप्त झालेले दर हे सन २००४-०५ मधील प्राप्त दरापेक्षा रु. ४३४ ने कमी होते. सन २००५-०६ मध्ये एकूण २१ उद्योग घटकांनी निविदेत भाग घेतला होता. त्यापैकी १२ उद्योग घटकांच्या व्यापारी लिफाफा उघडण्यात आला होता. सन २००५-०६ मध्ये जास्त लघुउद्योग घटकांनी निविदेमध्ये भाग घेतला होता. त्यामुळे स्पर्धा होऊन मागील वर्षापेक्षा कमी दर प्राप्त झाले होते. तसेच निविदेत भाग घेणाऱ्या उद्योग घटकांना मागील वर्षाचे दर माहित असल्यामुळे आदेश प्राप्त माहित असल्यामुळे आदेश प्राप्त करण्याच्या दृष्टीने त्यंनी कमी दर सादर केले.

४. भारताचे नियंत्रक व महालेखाकार यांनी महामंडळाकडे प्राप्त दरांची महासंचालक, पुरवठा व विल्हेवाट (डीजीएसॲण्डडी, नवी दिल्ली) यांनी आयएसआय तपशीलासाठी केलेल्या दर आकार (२००५-०६) मधील दरामध्ये असलेल्या तफावतीबाबत खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे :-

१) डिजीएसॲण्डडी यांच्या दर करारामधील दरामध्ये खालील अटींचा समावेश होता.

अ) सदर दर हे फक्त मुंबई पुरते होते व फक्त २० कि.मी. अंतरापर्यंत पुरवठा करण्यात येणार होता.

ब) या दराव्यतिरिक्त चार टक्के विक्री कर अतिरिक्त होता.

क) या दरामध्ये फक्त एक वर्षाची उत्पादन त्रुटीबाबतची हमी देण्यात आली होती.

२) महामंडळाने सन २००५-०६ करता निश्चित केलेल्या दरामध्ये खालील अटींचा समावेश होता :-

अ) या दरात १२.५ टक्के मुल्यविर्धित कराचा समावेश होता.

ब) अग्निशामक नळांड्यांचा पुरवठा हा संपूर्ण महाराष्ट्रात करावयाचा होता.

क) पुरवठा करण्यात आलेल्या अग्निशामक नळकांड्यांचा पुरवठा जागेवर करुन त्याच्या हाताळणीबद्दल हाताळणाऱ्यास प्रशिक्षण देण्याचा समावेश होता.

ड) पुरवठा करण्यात आलेल्या नळकांड्यांमध्ये तीन वर्षापर्यंत विनामुल्य पावडरचा भरणा करण्यांत

येणार होता.

ई) अग्निशामक नळकांड्यांची उत्पादनातील त्रुटी पाच वर्षाकरीता हमी देण्यात आली होती.

वरील दोन्हीही अटी व शर्तींचा वापर करता महामंडळाने दिलेल्या दराकरीतांच्या अटी व डिजीएसॲण्डडी यांच्या दर करारातील अटी यामध्ये बरीच तफावत होती.

महामंडळाकडे प्राप्त दरातील मूळ किंमतीमध्ये लघूउद्योग घटकांच्या कराखान्यापासून ते महाराष्ट्रात कोठेही उभारणी करण्यात येणार होते. पुरवठा करण्यात येणाऱ्या अग्निशामक नळकांड्यांच्या वापराबाबत ते हाताळणाऱ्या व्यक्तिस प्रशिक्षण देण्याच्या अटीचासुद्धा समावेश होता. या दरामध्ये तीन वर्षाकरिता विनामूल्य पावडरचा भरणा करावयाचा होता. ज्याकरिता लघूउद्योग घटकाच्या प्रतिनिधीस प्रत्येक जागेस प्रत्येक वर्षी पावडर भरणा करण्याकरिता लागणाऱ्या खर्चाचा समावेश होता. महामंडहामार्फत उत्पादनातील त्रुटीसाठी पाच वर्षाची हमी देण्यात आल्यामुळे त्याचा सुद्धा मूळ खर्चात समावेश करण्यात आला होता. वरील सर्व घटकांमूळे महामंडळाचे मूळ दर व डिजीएसॲण्डडी यांच्या मूळ दरामध्ये तफावत दिसते.

महामंडळाने दोन्ही वर्षाकरीता खुल्या निविदा प्रसिद्ध करुन दर मागविले होते. व या निविदेतील प्राप्त कमीत कमी दर शासनास सादर करण्यात आले होते.

सन २००४-२००५ मध्ये अग्निशामक नळकांड्यांचा पुरवठा करताना काढलेल्या निविदेमध्ये महामंडळाने लघुउद्योग घटकास त्याला देण्यात आलेल्या आदेशाच्या १० टक्के रकमेएवढी कार्यपूर्ती हमी सादर करण्याची अट अंतर्भूत केली होती. या निविदेच्या अटी व शर्तींमध्ये अग्निशामक नळकांड्यांत पावडरचा भरणा करण्याकरिता रक्कम रोखून ठेवण्याची अटी व शर्तींचा समावेश नव्हता. यामुळे उद्योग घटकांनी त्यांना दिलेल्या आदेशाच्या दहा टक्के रक्कमेएवढी पुरवठा हमी सादर केल्यानंतर त्यांना महामंडळाकडे प्राप्त पूर्ण रकमेची अदायगी करण्यात आली. महामंडळाने प्रसिद्ध केलेल्या निविदेत पुर्नभरणा करण्याकरीता रक्कम रोखून ठेवण्यासाठी अट नसल्यामुळे भारताचे महालेखाकार व महानियंत्रक यांनी नमूद केल्याप्रमाणे पुर्नभरणी आकाराचे अग्रीम प्रदान लघूउद्योग घटकास झाले नाही.

सन २००५-२००६ मध्ये पुर्नभरणी करीता रु.९७२/- एवढे दर देवूनसूद्धा त्यापैकी रु.३७०/- या दराने पुर्नभरणी आकाराचे अग्रीम प्रदान केले असा आक्षेप आहे. सदर पुर्नभरणी

आकाराचे प्रदान हे शासन निर्णय दि.२९/३/२०१० मध्ये नमूद केल्याप्रमाणे १५ टक्के रककम रोखून उर्वरीत रकमेचे प्रदान उद्योग घटकास केले आहे.

शेवटी असे नमूद करण्यात येते की, सदर निविदा ही वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन मागविण्यात आली होती व निविदेत प्राप्त झालेल्या स्पर्धात्मक कमीत कमी दरामधूनच दर निश्चित करण्यात आले होते. दर निश्चित करताना अवलंबण्यात आलेल्या पद्धतीमध्ये कुठलीही कायदेशीर उणीव नव्हती. निविदेमध्ये देण्यात आलेले स्पर्धात्मक दर हे त्यावेळच्या बाजारातील परिस्थिती व निविदेतील अटी व शर्ती वर अवलंबून होते. निविदेत प्राप्त झालेले दर हे स्पर्धात्मक होते व ते संबंधित शासकीय विभागाने मान्य केले होते. त्यामुळे सन २००४-०५ व २००५-०६ च्या दरांची तुलना करुन सन २००४-०५ ने दर हे जास्त होते हो निष्कर्ष काढणे बरोबर होणार नाही. सदर निष्कर्ष दोन्ही वर्षी दर सोडून सर्व गोष्टी समान असल्यास हा निष्कर्ष लागू पडेल. परंतू वरील दोन्ही वर्षी दर सोडून सर्व या गोष्टी लागू होत नाहीत. बाजारभाव व बाजारातील इतर घडामोडी तसेच निविदेतील अटी व शर्ती या डिजीएसॲण्डडी यांच्या निविदेतील वेगळ्या असल्यामुळे महामंडळाकडे प्राप्त दर हे डिजीएसॲण्डडी पेक्षा वेगळे होते.

४.३ महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली.

४.४ साक्ष :

लघु उद्योग विभागाकडून सादर करण्यात आलेल्या लेखी स्पष्टीकरणानुसार लघु व मध्यम उद्योग विभागाचे सचिव तसेच महाराष्ट्र लघु उद्योग विभाग महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांची बुधवार दिनांक २७ ऑक्टोबर, २०१० रोजी साक्ष घेण्यात आली. राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्याचा निर्णय झाला व त्याला ११ कोटीचे वित्तीय सहाय मंजूर केले होते. अग्निशमन यंत्रे खरेदीसाठी जिल्हापरिषदेचा मागणीनुसार त्यांना देण्यात येणाऱ्या शालेय शिक्षण विभागाच्या निधीमधुन खर्च करण्याची परवानगी दिली होती. त्यानुसार शासनाने ठरविण्यात आलेला लघू उद्योग विभाग महामंडळाच्या माध्यमातून खरेदी करण्याचा निर्णय झाला होता. त्यानुसार लघु उद्योग महामंडळाने खरेदीसाठी निविदा देण्याकरता माहिती व जनसंपर्क महासंचालकास विनंती केली होती. त्यानुसार प्रथम मागणी

रत्नागिरी जिल्ह्याकडून प्राप्त झाल्यानंतर तेथील स्थानिक वृत्तपत्र "दै.समानता" व "दै.रत्नभूमी" या कमी खप असलेल्या वृत्तपत्रामध्ये तेथील माहिती व जनसंपर्क अधिकारी यांनी जाहिरात दिली त्यामुळे दोनच पुरवठा दारांनी निविदा सादर केल्या. लघु उद्योग महामंडळाकडून राज्यस्तरीय वृत्त पत्रातून जाहिरात देण्याची विनंती माहिती व जनसंपर्क संचालकाला केली असता त्यांनी दै.समानता दै.रत्नभूमीसारख्या कमी खप असलेल्या स्थानिक वृत्तपत्रातून जाहिराती दिल्या. त्यामुळे स्पर्धात्मक निविदा प्राप्त होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे महालेखाकारांनी घेतलेल्या मूळ आक्षेपानुसार अपर्याप्त, प्रसिध्दीमुळे फक्त अल्प पुरवठादारांनी निविदेमध्ये सहभाग घेतला. त्यामुळे अग्निशमन यंत्राच्या कमी दराची सुयोग्यतेची खात्री करणे शक्य झाले नव्हते. परंतु त्याच कारणासाठी दुसरी निविदा राज्यस्तरीय वृत्तपत्रांतून प्रसिद्धी झ ाल्यानंतर अनेक पुरवठादारांनी वृत्तपत्रांमध्ये सहभाग घेतला. पर्यायाने अग्निशमन यंत्राची कमी दरांची निविदा प्राप्त झाली होती हे दिसून येते. याबाबत विभागीय सचिवांनी आपल्या साक्षीमध्ये नमूद करताना असे म्हटले होते की, पहिल्या निविदेमध्ये अटी घालण्यात आल्या नव्हत्या परंतु करारपत्रामध्ये त्या घालण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्रत्येक अग्निशमन यंत्राची किंमत रु.४९००/- होती. दुसऱ्या निविदेमध्ये प्रत्येक अग्निशमन यंत्राची किंमत रु.४५०० होती. परंतु अग्निशमन यंत्र रिफीलींगसाठी रु.९७२ स्वतंत्र दाखविण्यात आले होते. हे जरी खरे असले तरी महालेखाकारांच्या आक्षेपानुसार राज्यस्तरीय जाहिराती अभावी कमी देकार मिळण्यापासून महामंडळाला वंचित रहावे लागले होते. हे उघड दिसून येते. याबाबत स्पर्धात्मक दर मागविण्याच्या दृष्टीने राज्य स्तरीय वृत्तपत्रातून जाहिरात देण्याची काळजी घेण्यात आली नाही, असे समितीचे मत नोंदविल्यानंतर व्यवस्थापकीय संचालक यांनी ते मान्य केले. याबाबत पुरवठादारांनी करारातील शर्तीनुसार अग्निशमन यंत्रामध्ये तीन वर्षाकरीता विनामुल्य पावडरचा भरणा करणे, उत्पन्नातील त्रुटींची पाचवर्षांची हमी, अग्निशमन नळकांड्यांचा वापर करण्यास हाताळण्याचे प्रशिक्षण देणे. या अटी देखील पुरवठादारांकडून पाळल्या गेल्या नाहीत, या समितीच्या प्रश्नांना उत्तर देताना व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की एकूण ११ हजार नळकांड्या होत्या व त्यापैकी ३५०९ नळकांड्यांची पुर्नभरणी केली, बाकीच्या नळाकांड्यांची पुर्नभरणी केलेली नाही. त्यांची देयक अद्याप अदा केलेली नाहित. याचे प्रमाण जवळ जवळ १५ टक्के असल्याचे विभागीय सचिवांनी विशद केले. यासर्व

प्रकरणाची पार्श्वभुमी विशद करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, रत्नागिरी जिल्हापरिषदेकडून मागणी प्रस्ताव पाठविताना त्यांनी दरसूची बाबत विचारणा केली होती. आमच्या विभागाकडे याबाबत दरसूची नसल्याने बांधकाम विभागामार्फत या प्रकरणी कार्यवाही होत असल्याने आम्ही रत्नागिरीच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दरसूची बाबत विचारणा केली. त्यांनी स्पर्धात्मक दर तपासून रुपये ४९५० दराबाबत कळविले होते. त्यानुसार एकूण राज्यातील शाळामध्ये १८०५४ नळकांड्या पूरविण्यात आल्या होत्या. त्यांचा दर रुपये ४५१६ होता. त्यांची एकूण किंमत ८ कोटी ८२ लाख होते. त्यापैकी ६ कोटी ८३ लाखाची रक्कम पुरवठादारास अदा केली असून १ कोटी ५९ लाख रक्कम अद्याप अदा केली नाही. पुरविण्यात आलेल्या ३५०० नळकांड्यांचे पुर्नभरणा झाले होते. इतर १५ हजारांपैकी किती नळकांड्यांचे पुर्नभरण झाले याची माहिती आता उपलब्ध नाही असे देखील विभागीय सचिवांनी एका प्रश्नाच्या उत्तरादाखल स्पष्ट केले. राज्यस्तरावर जिल्ह्यानुसार पुरविण्यात आलेल्या नळकांड्या पुढील प्रमाणे असून ठाणे जिल्हा- २०२, नांदेड-१०, अकोला-१५०० सोलापूर-१९९, रत्नागिरी-२०९ बाकीच्या

मध्ये १०० ते २०० नग या प्रमाणे नळकांड्या पुरविण्यात आल्या आहेत. मान्यता प्राप्त डीसीएस अण्डडी यांचे दर विचारात घेण्याबाबत अटी घालण्यात आल्या होत्या परंतु डी.सी.एम. कंपनीच्या दर करारात फक्त मुंबई परिसरातील २० कि.मी.पर्यंत पुरवठा करण्याची प्रथम अट होती. व त्याशिवाय चार टक्के विक्रीकर अतिरिक्त होता. उत्पादन त्रुटीबाबतची हमी एक वर्षाची देण्यात आली होती व पुर्नभरणीसाठी त्यांनी नमूद केले नव्हते. त्यामुळे त्यांना यामध्ये स्वारस्य असल्याचे दिसून आले नाही असेही विभागीय सचिवांनी एका स्पष्टीकरणात्मक मुद्दयानी स्पष्ट केले.

तामिळनाडूमधील एका शाळेला लागलेल्या आगी मध्ये बऱ्याच विद्यार्थ्यांची जिवीतहानी झाली. त्यामुळे मंत्रीमंडळ स्तरावर निर्णय घेतला गेला व याबाबत सर्वोच्च न्यायालयाने तामिळनाडूमधील घटनेनंतर मार्गदर्शक तत्व अनुसरण्यास सांगितले होते. ही देखील पार्श्वभूमी होती. परंतु हे ठरवितांना महाराष्ट्रातील शाळांची संख्या विचारात घेऊन किती शाळांमध्ये अग्निशमन यंत्रणा उपलब्ध करुन देता येईल याचा विचार झाल्याचे दिसून येत नसून घाईघाईने अधिकारी निर्णय घेतला गेला असे प्रत्यक्षदर्शी दिसून येते. या मा.समिती प्रमुखांच्या

प्रश्नाचे उत्तर देताना विभागीय सचिवांनी सांगितले की शासनाने निर्णय घेताल्यानंतर अंमलबजावणी केली जाते. परंतु प्रत्यक्ष स्थानिक पातळीवरील कार्यपद्धतीमध्ये अभाव असतो. शासनाच्या प्रॉकूरमेंट धोरणामध्ये बऱ्याच त्रुटी असून सद्य स्थितीमध्ये दिनांक २ जानेवारी, १९९२ च्या शासन निर्णयावर आधारीत खरेदी प्रक्रीया होत असते. यामध्ये बदल करण्याची गरज असून त्यानुसार नवीन प्रॉकूरमेंट मॅन्युअल तयार करण्याचे काम हाती घेतले असून त्याचा फायदा भविष्यकाळात दिसून येईल. अग्निशमन यंत्राच्या उत्पादन त्रुटी बाबत ५ वर्षाची वॉरन्टी असल्याने या प्रकरणी पुरवठादारांकडून घडलेल्या त्रुटीबाबत कार्यवाही करुन घेता येईल असे शेवटी स्पष्ट केले.

४.५ अभिप्राय व शिफारशी

राज्यातील शाळांमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्याबाबतचा निर्णय तामिळनाडूमधील शाळेतील विद्यार्थ्यांच्या बाबतीत घडलेल्या आकस्मिक घटनेनंतर व तद्नंतर सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार शासनाकडून शालेय शिक्षण विभागामार्फत मंत्रीमंडळस्तरावर निर्णय घेतला गेला व त्याची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने खरेदीसाठी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाला नेमण्यात आले होते. लघु उद्योग विकास महामंडळाकडून जिल्हापरिषदांना मागणी नोंदविण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार प्रथम मागणी केलेल्या जिल्हापरिषद रत्नागिरीसाठी अग्निशमन नळकांड्या पुरविण्यासाठी कार्यवाही सुरु झाली. त्यानुसार लघु उद्योग विकास महामंडळाकडून प्रचलित नियमानुसार माहिती व जनसंपर्क संचालक यांना निविदा प्रक्रीयेची जाहिरात देण्यासाठी कळविले. त्याप्रमाणे रत्नागिरी माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडून कमी खप असलेल्या "दै.समानता" व "दै.रत्नभूमी" यामध्ये जाहिराती प्रसिद्ध झाल्या. त्यामुळे स्थानिक अल्प पुरवठादारांनी निविदा प्रक्रीयेमध्ये सहभाग घेतला. वास्तविकत: लघू उद्योग विकास महामंडळाकडून निविदा प्रक्रीयेची जाहिरात देण्यासाठी राज्यस्तरीय वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्याची मागणी माहिती व जनसंपर्क संचलनालयाकडे केल्यानंतर एका जिल्ह्यातील स्थानिक कमी खपाच्या वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध झाल्याने स्पर्धात्मक दर मागविण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय वृत्तपत्रामधून जाहिरात देण्याची प्रथम काळजी न घेणे ही अतिशय गंभीर बाब असल्याचे समितीला दिसून आले. दुसऱ्या

निविदेसाठी तद्नंतर चूक सुधारून राज्यस्तरीय वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध केल्यामुळे कमी दराचे देकार महामंडळाकडे प्राप्त झाले होते. याचा फायदा देखील महामंडळास झाल्याचे दिसून आले. यामुळे महालेखाकारानी घेतलेल्या जाहिरात प्रसिद्ध करण्याचा मुळ आक्षेप योग्यच होता. दुसरी निविदा प्रसिध्द केल्यानंतर पुरवठादारानी सादर केलेल्या कमी दराच्या निविदेमुळे तो दिसून आला. परंतु करारामध्ये असलेल्या नळकांडया पुर्नभरणी, अग्निशामन नळकांडया उत्पादनांतील पाच वर्षाची हमी व अग्निशामक नळकांडया वापर करण्यासाठी हाताळणीचे प्रशिक्षण या अटी पाळण्याकडे पुरवठादारांनी दुर्लक्ष केले याबाबत देखील लघु उद्योग, विकास महामंडळाकडून अथवा संबंधित जिल्हापरिषदेकडून त्याची पडताळणी देखील करण्यात आली नाही. ही बाब पुरविण्यात आलेल्या नळकांडयापैकी जास्तीत जास्त नळकांडयाची पुर्नभरणी न केल्याचे समितीस दिसून आले त्यावरुन स्पष्ट होते. याबाबत विभागाकडून काही रक्कम त्यांना अदा करण्याचे राखून ठेवले असले तरी अशा महत्वाच्या प्रश्नावर शासकीय यंत्रणेकडून गांभिर्य दाखविल्याचे दिसून येत नाही. याकरीता समिती अशी शिफारस करीत आहे की, महत्वाच्या प्रश्नावर खरेदी करीत असताना वृत्तपत्रातील निविदा प्रसिध्द करण्याबाबत अनुसरण्यात आलेली पध्दत संशयास्पद दिसून येते यामध्ये व्यापारी व वाणिज्यिक पध्दतीचा संपूर्णपणे अभाव दिसतो, तरी याबाबत पुढील काळात महाराष्ट्रातील सर्व जिल्हास्तरावर व राज्यस्तरावर वृत्तपत्रातून अशी निविदा प्रक्रियेच्या जाहिराती प्रसिध्द करण्यात याव्यात, माहिती व जनसंपर्क संचालकमंडळाकडून आवश्यक ते नियम बदलून कार्यवाही करण्याची सतर्कता राखावी. सुरवातीच्या काही महत्वाच्या बाबी काटेकोरपणे पाळण्याकडे लघु उद्योग विकास महामंडळाकडून दुर्लक्ष झाल्यामुळे पुढील प्रश्न याप्रकरणी उपस्थित झाले होते. यामुळे लघु उद्योग विकास महामंडळाकडून यापुढे कार्यपध्दती अवलंबिताना अधिक सतर्कता बाळगावी.

तामिळनाडू मधील घटनेनंतर शासनाने शाळेमध्ये अग्निशामक यंत्रणा बसविण्याबाबत निर्णय घेतला. शासनाचा धोरणात्मक निर्णय योग्य होता याबाबत समितीचे दुमत नाही. पंरतु याबाबत महाराष्ट्रातील एकूण शाळांची संख्या पाहता सर्व शाळांमध्ये अग्निशामक नळकांडया उपलब्ध करुन देता येतील किंवा नाही व अशा महत्वाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी स्थानिक स्तरांवर सक्षमता आहे की नाही याचा विचार होणे अत्यंत गरजेचे होते. अग्निशामक नळकांडया पुरविण्यात आल्यानंतर त्याच्या पुर्नभरणीकडे झालेले दुर्लक्ष व त्याचा वापर

करण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण न घेतल्यामुळे सर्व योजना पुर्णपणे सफल झाली नसल्याचे समितीस दिसून आले आहे. शाळकरी मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने इतक्या महत्वाचा निर्णय अवलंबण्यामधील या अनियमित बाबी समिती दुर्लक्षीत करु शकत नाही. स्थानिक स्तरावर जेथे या उपकरणांचा वापर होणार होता तेथील कर्मचाऱ्यांकडून याबाबत योग्य प्रशिक्षण देऊन या उपकरणाचा योग्य वापर निश्चित होवू शकला असता तथापि, याकडे दुर्लक्ष झाले आहे व पुरवठादारांकडून देखील योग्य ती कार्यवाही ठरलेल्या मुदतीमध्ये करुन घेण्यात आलेली दिसून येत नाही. त्यांच्या पाच वर्षाच्या सद्य:स्थिती पर्यंत असलेल्या वॉरन्टी कालावधीत विहित अटींची पूर्तता विना विलंब विहित कालावधीत करुन घ्यावी व भविष्यात महत्वाचा निर्णय घेताना त्याबाबत पुर्णपणे विचार करुन नियोजन करावे जेणेकरुन शासनाच्या निर्णयाची अचूक कार्यवाही होऊ शकेल.

शासनाच्या प्रोक्युमेंट धोरणाचा विचार करताना विभागीय सचिवांनी समितीमध्ये विशद केलेल्या स्पष्टीकरणानुसार तयार करण्यात येणारे नविन प्रोक्युमेंट मॅनुअल लवकरात लवकर तयार करावे जेणेकरुन २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयामध्ये असलेल्या त्रुटींची परिपूर्तता करुन नविन मार्गदर्शक व फायदेशीर धोरण अवलंबिता येईल.

याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी.

दोन : क्रिडा मैदानी उपकरणे खरेदीमधील जादा खर्च

५.१ : भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१७ मध्ये "क्रिडा मैदानी उपकरणे खरेदीमधील जादा खर्च " या संदर्भात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, **कंपनीने क्रिडामैदानी उपकरणे खरेदीसाठी एकतर निविदा मागविल्या नव्हत्या किंवा उपलब्ध विधीग्राह्य देकार विचारात न घेतल्यामुळे रु. २९.३२ लाखांचा जादा खर्च झाला होता. :**

महाराष्ट्र शासनाने राज्यामधील आश्रमशाळांसाठी महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळ, मर्यादीत कंपनीमार्फत क्रिडामैदानी उपकरणांची १८७ संच खरेदी करण्याच्या आदिवासी विकास आयुक्त, नाशिक यांच्या प्रस्तावाला मंजूरी (नोव्हेंबर,२००५) दिली होती.

त्यादरम्यान कंपनीला अरिहंत इंडस्ट्रीज महामंडळ मर्यादीत, वसई (संस्था) यांच्याकडून स्वत:हून ही उपकरणे रु. १,११,९००/- प्रति संच (व्हॅट करासहित) पुरविण्याचा एक देकार (फेब्रुंवारी,२००५) मिळाला होता व हा देकार दिनांक ३१ मार्च, २००६ पर्यंत विधीग्राह होता.

परंतू कंपनीने एवढ्या मोठ्या खरेदीसाठी एकतर स्पर्धात्मक दर मिळविण्यास निविदा मागविल्या नाहीत किंवा संस्थेकडून स्वत:हून मिळालेला विधीग्राह देकार ही विचारात घेतला नाही. कंपनीने दुसऱ्या संस्थाकडून क्रिडामैदानी उपकरणाचे १८७ संच खरेदी करण्यासाठी रु.१,२३,२००/- प्रति संच (व्हॅट करासहित) दराने रु. २.३१ कोटीचा मागणी आदेश नोंदविला (डिसेंबर,२००५) होता.

अशारीतीने कंपनीला निविदा मागविण्यात व उपलब्ध विधीग्राहय देकाराचा विचार करण्यात अपयश आल्यामुळे रु.२१.३२ लाखाचा* जादा खर्च झाला होता. त्याचप्रमाणे असेही निदर्शनास आले की, त्याचा संस्थेचे भिवंडी महानगरपालिकेला रुपये १,११,९००/- प्रति संच या दराने याआधीच या संचाचा पुरवठा जानेवारी,२००६ मध्ये केला होता.

व्यवस्थापकाने म्हटले होते (एप्रिल,२००८) की आदिवासी विकास विभागाचे दरांची तपासणी केली असेल असे गृहीत धरुन दराच्या सत्यतेविषयी पुष्टी कंपनीने केली नाही. परीणामस्वरुप जादा दर स्विकारण्यात आले होते.

हे उत्तर स्विकारण्यायोग्य नव्हते. कारण कंपनीने एकतर एवढ्या मोठ्या खरेदीसाठी निविदा मागवायला हव्या होत्या किंवा त्याच संस्थेचे उपलब्ध विधीग्राह्य दर विचारात घेणे आवश्यक होते व जादा खर्च टाळायाला हवा होता.

५.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमुद केले की,

महामंडळाच्या विपणन सहाय्य योजनेअंतर्गत एखाद्या खरेदीवर विभागास खरेदी करावयाच्या वस्तूची मागणी लक्षात घेवून महामंडळामार्फत, महामंडळाकडे नोंदणीकृत लघुउद्योग घटकांकडून दर मागविण्यात येतात. प्राप्त दरामधील न्युनतम दरानुसार दरसूची तयार करुन ती सदर वस्तूची मागणी असणाऱ्या विविध विभागांस पाठविण्यात येते. विभागीय

व्यवस्थापक , ठाणे यांनी सन २००४-२००५ मध्ये क्रिडा मैदानी उपकरणांसाठी त्यांच्या विभागतील नोंदणीकृत उद्योग घटकांकडून महामंडळाच्या विहित पध्दतीचा अवलंब करुन दर मागविले होते व प्राप्त न्युनतम दराची दरसूची तयार केली होती. या दरसूचीमध्ये नमूद केलेले दर हे दिनांक ०१.१०.२००४ ते ३१.०३.२००५ या कालावधीकरिता ग्राह्य होते. दरसूचीमधील दर हे सर्व कर समाविष्ट होते.

आदिवासी विकास आयुक्त, नाशिक यांना त्यांच्या आश्रमशाळांकरिता क्रिडामैदानी उपकरणे खरेदी करावयाची आहेत. विभागीय व्यवस्थापक, ठाणे यांनी तयार केलेल्या दरसूचीतील आदिवासी विकास आयुक्त यांना आवश्यक असलेल्या क्रिडामैदानी उपकरणे यांचा समावेश असल्यामुळे विभागीय व्यवस्थापक, ठाणे यांनी तयार केलेल्या दरसूचीच्या आधारावर मुंबई मुख्य कार्यालयाने आदिवासी विकास आयुक्त, नाशिक यांना क्रिडा मैदानी उपकरणे खरेदीसाठीचा प्रस्ताव सादर केला होता. विभागीय कार्यालय, ठाणे यांनी तयार केलेल्या दरसूचीतील न्युनतम दर मे.अरिहंत इंडस्ट्रिज,ठाणे यांचे होते. आदिवासी विकास आयुक्त, नाशिक यांनी महामंडळाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार त्यांना आवश्यक १८७ क्रिडामैदानी उपकरण संघाचा प्रस्ताव आदिवासी आयुक्त, महाराष्ट्र शासन मंत्रालय यांना सादर केला होता. या १८७ संघाची एकूण किंमत रु.२,०९,२५,३००/- एवढी होती. आदिवासी विकास आयुक्त, नाशिक यांना खरेदी करावयाच्या क्रिडामैदानी उपकरणांची संख्या अथवा त्यांनी शासनाकडे प्रस्तावित केलेल्या क्रिडा संघाची संख्या व किंमत याबाबत महामंडळास माहिती नसल्यामुळे आदिवासी विकास आयुक्त यांना प्रस्ताव सादर करताना महामंडळामार्फत निविदा मागविण्यात आल्या नव्हत्या.

महालेखाकार कार्यालय (वाणिज्यिक लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या लेखापरीक्षणदरम्यान महामंडळामार्फत पुरवठा करण्यात आलेल्या क्रिडा मैदानी उपकरण संचाच्या किंमतीमधील फरक निदर्शनास आणून दिल्यानंतर महामंडळाने मे.अरिहंत इंडस्ट्रिज यांच्याकडून लेखापरिक्षण दरम्यन निदर्शनास आणलेली रक्कम रु. २१.३२ लक्ष ही सदर उद्योग घटकास विभागीय कार्यालय, पुणे यांच्याकडून देय असलेली रक्कम रु. २४.२७ लाख मधून दिनांक १३.०४.२००७ रोजी वसूल केली. महालेखाकार कार्यालय (वाणिज्यिक लेखापरीक्षक) यांनी त्यांच्या लेखापरिक्षणदरम्यान निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे सर्व रकमेची वसुली उद्योग

घटकामार्फत करण्यात आल्यामुळे सदर क्रिडामैदानी उपकरणांच्या खरेदीपोटी अधिक खर्च झालेला नाही.

५.३ महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

५.४ : साक्ष

महाराष्ट्र शासन व लघु उद्योग विकास महामंडळाकडून लेखी माहिती प्राप्त झाल्यानंतर समितीने विभागाचे सचिव व लघुउद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांची बुधवार दिनांक २७ ऑक्टोबर, २०१० रोजी साक्ष घेतली. महाराष्ट्र शासनाकडून राज्यातील आश्रमशाळामध्ये क्रिडा मैदानी उपकरणे पुरविण्यासाठी आदिवासी विकास आयुक्त, नाशिक यांच्याकडून सादर केलेल्या प्रस्तावाला मंजूरी दिली होती. त्यासाठी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाने क्रिडा मैदानी १८७ उपकरणांची खरेदी करावयाची होती. त्यासाठी अरिहंत इंडस्ट्रिज (वसई) यांच्याकडून महामंडळास प्रती संच रु १,११,९०० व्हॅट करासहित पुरविण्याचा देकार सादर केला होता व तो ३१ मार्च, २००६ पर्यंत विधीग्राह होता. महालेखाकारांनी आक्षेप नोंदविताना म्हटले होते की यासाठी स्पर्धात्मक दर मिळण्यासाठी निविदा मागविल्या नव्हत्या व प्रत्यक्ष कंपनीकडून सादर करण्यात आलेला देकार देखील विचारात घेतला गेला नव्हता. याउलट प्रत्येक संच खरेदी विषयी देकार तयार केलेल्या कंपनीकडून १, २३, २०० या दराने २.३१ कोटीच्या मागणीचा आदेश नोंदविला होता. त्यामुळे उपलब्ध विधीग्राहय देकार विचारात न घेतल्यामुळे महाराष्ट्र लघु उद्योग व विकास महामंडळाकडून रु २१.३२ इतका जास्त खर्च केला गेला. या महालेखाकारांचा आक्षेपावर मा.समिती प्रमुखांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना व्यवस्थापकीय संचालकांनी सांगितले की, आदिवासी विकास आयुक्त यांच्या प्रस्तावाला शासनाकडून मंजूरी मिळाल्यानंतर मे.अरिहंत इंडस्ट्रिजकडून स्वत: सादर केलेला अर्ज आदिवासी आयुक्तालयाकडे सादर मंजूरीसाठी सादर केलेला होता. त्या अर्जामध्ये नमूद केलेले दर दि. ३० मार्च, २००५ मधील होते महामंडळाच्या अधिपत्याखाली लघु उद्योगाची क्वॉलिटी चांगली असते व त्यास ISI चे प्रमाणपत्रदेखील असते. याकरिता निविदा न मागविता स्वत:कडून सादर केलेला मे. अरिहंत कंपनीकडील अर्ज आदिवासी आयुक्ताकडे पाठविला गेला होता. दि.१ एप्रिल २००५ नंतर शासनाकडून व्हॅट

करावरील दर १२.५ टक्क्यांपर्यंत वाढविला होता. जो पूर्वीचा दर ५.४ होता. त्यामुळे यासाठी विचारात घेऊन आदिवासी विभागाकडून प्रति संचास रु १,२३,२०० मान्यता दिली गेली व त्याप्रमाणे आदिवासी विभागाकडे साहित्य पुरवित गेले. महालेखाकरांनी केलेल्या लेखापरिक्षणामध्ये कंपनीकडून सादर केलेल्या देकाराची विधीग्राहय दि. ३१ मार्च,२००६ पर्यंत दाखविण्यात आल्यानंतर याबाबतची वसूली देकार सादर करण्यात आलेल्या कंपनीकडून करण्यात आली. याचा अहवाल महालेखाकारांना निदर्शनास आणली नसल्याबाबत विचारणा केली असता विभागीय सचिवांनी त्याबाबतचा अहवाल महालेखाकारांना उपलब्ध करुन दिला जाईल असे साक्षीच्या शेवटी स्पष्ट केले.

५.५ अभिप्राय व शिफारशी

महाराष्ट्र शासनाकडून आदिवासी विकास आयुक्तांच्या प्रस्तावावर राज्यातील आश्रमशाळेमध्ये क्रिडा मैदानी उपकरणे पुरविण्याचा निर्णय झाल्यानंतर लघु उद्योग विकास महामंडळाकडून कार्यवाही सुरु करण्यात आली. त्यावेळी स्वत: मे. अरिहंत इंडस्ट्रिजकडून सादर करण्यात आलेल्या देकार दि.३१ मार्च, २००६ पर्यंत विधीग्राहय होता त्यास मंजूरी न देता व स्पर्धात्मक देकार न मागविता दि. १ एप्रिल, २००५ मध्ये व्हॅट दरातील वाढी बद्दल व स्वत: देकार सादर केलेल्या महामंडळाच्या अधिपत्याखाली लघु उद्योगाची क्वॉलेटी व कंपनीस असलेल्या आय.एस.आय. प्रमाणपत्राचे समर्थन करुन महामंडळाकडून केलेली कार्यवाही उचित नव्हती असे समितीचे मत आहे. आर्थिक व्यवहाराची पारदर्शकता स्पष्ट होण्यासाठी तसेच व्यापारी व वाणिज्यिक तत्वाचा धोरणात्मक दृष्टया पुर्णपणे वापर होण्यासाठी व स्पर्धात्मक बोलीद्वारे कमी किंमतीचे देकार प्राप्त होण्यासाठी महामंडळाकडून निविदा प्रक्रिया अवलंबणे अत्यंत गरजेचे होते. स्वत: सादर केलेल्या कंपनीचा देकार देखील ३१ मार्च, २००६ पर्यंत विधीग्राहय असताना त्याची कोणतीही पडताळणी न करता महालेखाकारांच्या आक्षेपानंतर कंपनीकडून जादा दराने करण्यात आलेल्या रक्कमेची वसूली केली असली तरी, समितीस सर्व कार्यवाही अनियमित दिसून येते तरी या प्रकरणी अधिक चौकशी करुन जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर उचित कारवाई करण्यात यावी, जेणेकरुन भविष्यामध्ये महामंडळातर्फे होणाऱ्या खरेदीविषयक पारदर्शकता दुर्लक्षीत होणार नाही. याप्रकरणी केलेली कार्यवाही समितीस तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी अशी ही समितीची शिफारस आहे.

बैठकींचे परिशिष्ट

बुधवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१० विधान भवन मुंबई.

उपस्थिती :

१. श्री. सदाशिव पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. अण्णा उर्फ मधु चव्हाण, वि.स.स.

३. श्री. विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.

४. श्री.संजय वाघचौरे, वि.स.स.

५. श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

६. श्री. चरणसिंह सप्रा, वि.प.स.

७. श्री. हेमंत टकले, वि.प.स.

८. श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री. श्रीधर राजोपाध्ये, उप सचिव
श्री. सुधीर वळवी, अवर सचिव (समिती)

<u>महालेखाकार कार्यालय, मुंबई</u>.

१. श्रीमती सायंतनी जाफा, महालेखापाल (वाणिज्यिक)
२. श्री. पी. पी. लोणकर, जेष्ठ लेखापाल अधिकारी.

<u>विभागीय प्रतिनिधी :</u>

१. श्री. संजय सेठी, सचिव, लघु व मध्यम उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. श्री. जी. जे. फिलीप, व्यवस्थापकीय संचालक, लघु व मध्यम उद्योग विकास महामंडळ.